# कायदेविषयक मार्गदर्शन मोफत




संपर्क
ॲड. सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३९४५१



RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ


**दि. ०४ जुलै २०२६**



१९२५- महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याचा ठराव केशवराव जेधे यांनी पुणे महानगर पालिकेकडे पाठविला.
१९५६- कोलंबोहून भिक्षू लोकनाथ यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पत्र.

संकलन प्रा. यशवंत दुपटे


शनिवार ०४ जुलै २०२६ | वर्ष : ६ | अंक : १८४ | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Saturday, 04 July 2026 | Year : 6 | Issue : 184 | Daily | Rate: Rs. 5/-


# विधानसभेत घोषणाबाजीने गदारोळ

**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात शुक्रवारी राज्यातील शेतकरी, पाणीटंचाई, पीकविमा, बेरोजगारी, कायदा-सुव्यवस्था आणि पायाभूत सुविधांचे प्रश्न केंद्रस्थानी राहिले. सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये विविध मुद्द्यांवर जोरदार चर्चा झाली.
अधिवेशनातील महत्त्वाचा निर्णय म्हणून सरकारने शेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या गाळ आणि मुरूमवरील रॉयल्टी रद्द करण्याची घोषणा केली. या निर्णयामुळे शेततळी, सिंचनाची कामे, शेतरस्ते आणि जलसंधारणाच्या विविध कामांना चालना मिळणार असून शेतकऱ्यांचा आर्थिक भार कमी होईल, असा दावा सरकारने केला.
प्रश्नोत्तराच्या तासात राज्यातील पाणीटंचाई, सिंचन प्रकल्प, ग्रामीण रस्ते, आरोग्य सेवा, शिक्षण आणि स्थानिक स्वराज्य संस्थांशी संबंधित अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले. संबंधित मंत्र्यांनी विविध योजनांच्या अंमलबजावणीची माहिती देत आवश्यक त्या ठिकाणी कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.
विरोधी पक्षांनी पीकविमा, वाढती महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या समस्या आणि कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नांवर सरकारला धारेवर धरले. या मुद्द्यांवर सभागृहात घोषणाबाजी झाली तसेच सरकारकडून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली.
राज्यात सुरू असलेल्या पावसाच्या पार्श्वभूमीवर पूरस्थिती, आपत्ती व्यवस्थापन आणि धरणांतील पाणीसाठ्याबाबतही सभागृहात चर्चा झाली. नागरिकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक यंत्रणा सज्ज असल्याची माहिती सरकारने दिली.
आजच्या कामकाजात शेतकरी हित, जलव्यवस्थापन आणि जनहिताच्या प्रश्नांवर सर्वाधिक चर्चा झाल्याचे चित्र दिसून आले. आगामी बैठकींमध्येही या विषयांवर अधिक सविस्तर चर्चा होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

## शेतकरी, पीकविमा आणि पाणीटंचाईच्या मुद्द्यावर सरकारला विरोधकांचा घेराव







### माहिती अधिकार कायद्यातील नियमांमधील वादग्रस्त बदलांना राज्य सरकारकडून स्थगिती

राज्यात माहिती अधिकार कायद्यातील (आरटीआय) काही नियमांमध्ये करण्यात आलेल्या वादग्रस्त बदलांना राज्य सरकारने अखेर स्थगिती दिली आहे. हे नवीन नियम म्हणजे आरटीआय कायदा बोथट करणं आणि त्यावर बंदी आणल्यासारखं आहे, असा आरोप होत होता. आरटीआय कार्यकर्त्यांकडून रोष व्यक्त करण्यात आला. तसेच ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी सुद्धा 5 जुलैला आंदोलनाचा इशारा दिला होता. या घडामोडींनंतर अखेर शासनानं याला स्थगिती दिली. महाराष्ट्र सरकारनं आरटीआयचे कोणते नियम बदलले होते. त्यावर आरटीआय कार्यकर्त्यांचे नेमके काय आक्षेप घेतले होते? पाहुयात. सरकारनं 12 जून 2026 रोजी माहिती अधिकार कायद्यात नवीन बदल लागू केले होते. यामध्ये एकूण 24 तरतुदी देण्यात आल्या होत्या. त्यापैकी काही नियम हे जुने आहेत.

## महाबोधी महाविहार मुक्तीसाठी आंदोलन तीव्र

### १९ जुलैपासून पटणा येथे मुख्यमंत्र्यांच्या निवासासमोर १० दिवसांचे उपोषण

**बोधगया :** महाबोधी महाविहाराच्या व्यवस्थापनाशी संबंधित बी.टी. ॲक्ट १९४९ रद्द करून महाबोधी महाविहाराचा संपूर्ण ताबा बौद्ध समाजाकडे सोपविण्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाने ५०० दिवसांचा टप्पा पार केला असून आता या आंदोलनाला राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले आहे. आंदोलनाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीने १९ जुलै २०२६ पासून बिहारचे मुख्यमंत्री यांच्या पटणा येथील अधिकृत निवासस्थानासमोर १० दिवसांचे बेमुदत उपोषण करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.
आंदोलनाचे महासचिव डॉ. आकाश लामा यांनी सांगितले की, आंदोलनाच्या ५०५ व्या दिवशी देशभरातील विविध ठिकाणी बौद्ध समाजाच्या वतीने उपोषणाचे आयोजन करण्यात आले. काही ठिकाणी प्रशासनाची परवानगी न मिळाल्याने कार्यक्रमावर परिणाम झाला. त्यामुळे या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा निघावा, या उद्देशाने पटणा येथे मोठ्या प्रमाणावर उपोषण करण्याचा निर्णय घेण्यात आला. बोधगया येथे झालेल्या तीन दिवसीय राष्ट्रीय कार्यकारिणी बैठकीत बिहार, झारखंड, पंजाबसह विविध राज्यांतील प्रतिनिधींनी सहभाग घेतला. सुमारे २१ समित्यांचे प्रतिनिधी आणि शेकडो समर्थक बैठकीला उपस्थित होते. बैठकीत केवळ आश्वासनांवर समाधान न मानता महाबोधी महाविहाराबाबत कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी सर्वानुमते करण्यात आली. महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन राष्ट्रीय समितीचे उपाध्यक्ष व मुख्य सल्लागार पूज्य भदंत धम्मशिखर यांनी सांगितले की, भारतीय संविधानातील अनुच्छेद २५ अंतर्गत



मिळालेल्या धार्मिक स्वातंत्र्याची महाबोधी महाविहारात पूर्ण अंमलबजावणी होत नसल्याचा त्यांचा आरोप आहे. आंदोलन पूर्णपणे शांततापूर्ण आणि लोकशाही मार्गाने सुरू असून विविध समाजघटकांचा त्याला पाठिंबा मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. आंदोलनाच्या वतीने बिहारचे मुख्यमंत्री, राज्यपाल आणि प्रधानमंत्री यांना निवेदने देण्यात आल्याची माहितीही देण्यात आली. दिल्लीमार्फत केंद्र सरकारपर्यंतही मागण्या पोहोचविण्यात आल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. हे आंदोलन कोणत्याही समाजाविरोधात नसून बौद्ध समाजाच्या धार्मिक अधिकारांच्या संरक्षणासाठी आणि महाबोधी महाविहाराच्या स्वतंत्र व्यवस्थापनासाठी असल्याचा दावा समितीने केला. बैठकीत काही वक्त्यांनी भगवान बुद्धांना विष्णूचा अवतार मानण्याच्या दाव्यावरही प्रश्न उपस्थित करत ऐतिहासिक आणि वैचारिक पातळीवर व्यापक चर्चेची गरज असल्याचे मत व्यक्त केले. बौद्ध समाजाची स्वतंत्र धार्मिक ओळख मान्य करण्याची मागणीही करण्यात आली. राष्ट्रीय समितीने देशभरातील बौद्ध बांधव, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायी आणि समर्थकांना १९ जुलैपासून पटणा येथे होणाऱ्या १० दिवसांच्या उपोषणात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले असून, महाबोधी महाविहार प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी पुन्हा एकदा जोरदारपणे मांडली आहे.

# महत्वाच्या बातम्या

## 'आपली बस' च्या जोरदार धडकेमुळे स्कूल व्हॅनचा चक्काचूर

**नागपूर :** शाळा सुरू होऊन जेमतेम दोन दिवस होत नाहीत तोच पंचशील चौकाजवळ मोठी दुर्घटना होता होता वाचली. शाळकरी मुलांना शाळेत सोडण्यासाठी निघालेल्या स्कुल बसला महापालिकेच्या आपली बसने धडक दिली. या घटनेत चार मुले जखमी झाली आहेत. पंचशील सिनेमा गृहाजवळ सकाळी सव्वा सातच्या सुमारास हा अपघात घडला. स्कूल व्हॅनला महापालिकेच्या आपली बससेवेच्या बसने धडक दिली. सकाळी नागपुरातील पंचशील चौकावर पत्रकार भवनातून कॅनल रोड कडे जाणाऱ्या स्कूल व्हॅन ला हा अपघात झाल्याचे परिसरात एकच खळबळ उडाली. बसची धडक जोरदार असल्यामुळे स्कूल व्हॅन चा काही भाग चेपला गेला. तर आत मध्ये बसलेले विद्यार्थी त्यांच्या सीट वरून खाली कोसळले. या घटनेत तीन ते चार विद्यार्थी जखमी झाले असून त्यांना प्रथमोपचारासाठी जवळच्या खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## अति मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर शाळा-महाविद्यालये बंद...

**मुंबई :** मुंबईला रेड अलर्ट दिला गेला असून मी मुंबई महापालिकेच्या आयुक्तांना भेटणार आहे. अति मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर शाळा-महाविद्यालये बंद ठेवण्यात यावी आणि मी कंपन्यांनाही आवाहन करतो की, त्यांनी फारच गरज असेल, तर कर्मचाऱ्यांना कार्यालयात बोललावे, असे शिंदेसेनेचे खासदार मिलिंद देवरा यांनी म्हटले आहे. मिलिंद देवरा यांनी साकीनाका येथे मॅनहोलमध्ये पडून मृत्यू झाल्याच्या घटनेबद्दल बोलताना म्हटले आहे की, जे याला जबाबदार आहे त्यांच्यावर कारवाई केली जावी. कंत्राटदाराला फक्त ब्लॅकलिस्ट करू नये, तर त्याला अटकही करण्यात यावी, असे ते म्हणाले

## काँग्रेस पक्षाने केंद्र सरकारवर चीनबाबत खूपच नरम भूमिका

**नवी दिल्ली :** काँग्रेस पक्षाने शुक्रवारी केंद्र सरकारवर हल्लाबोल करत असा आरोप केला की, नरेंद्र मोदी सरकारचे चीनसमोरचे सातत्यपूर्ण शरणागती पत्करणे देशातील उद्योगांना, विशेषतः सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना (एमएसएमई) मोठे नुकसान पोहोचवत आहे. पक्षाचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी ट्विटरवर एक मीडिया रिपोर्ट शेअर केला, ज्यामध्ये असा दावा करण्यात आला आहे की भारत सरकारने, भारतात कारखाने असलेल्या चार चिनी ऊर्जा उपकरण निर्मिती कंपन्यांना महत्त्वाच्या सरकारी ऊर्जा प्रकल्पांच्या निविदांमध्ये सहभागी होण्याची परवानगी दिली आहे.असे जयराम रमेश यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटले आहे, 'मोदी सरकारचे चीनसमोर हेतुपुरस्सर शरणागती पत्करणे सुरूच आहे. त्याच वेळी, चीनसोबतची भारताची व्यापार तूट विक्रमी पातळीवर पोहोचली आहे, ज्यामुळे देशातील उद्योगांना, विशेषतः एमएसएमईंना मोठे नुकसान होत आहे.' त्यांनी पुढे असेही म्हटले की, अरुणाचल प्रदेशबाबत चीनच्या चिथावणीखोर कारवाया सुरूच आहेत.

## 'स्टिंग', 'रेड बुल', 'पेप्सिको' ला FDA ची नोटीस

**मुंबई :** स्टिंग एनर्जी ड्रिंकमुळे आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांचा मुद्दा आज राज्य विधिमंडळ सभागृहात उपस्थित करण्यात आला. श्रागोंदाचे आमदार विक्रम पाचपुते आणि दौंडचे आमदार राहुल कुल यांनी याविषयी प्रश्न उपस्थित केला. यावर उत्तर देताना मंत्री नरहरी झिरवाळ यांनी शैक्षणिक संस्थेपासून किमान ५०० मीटरच्या परिसरात एनर्जी ड्रिंक विक्री करणाऱ्या आस्थापनांची तपासणी करुन नमुने घेणे आणि आक्षेपार्ह जाहिरातीविरुद्ध कारवाई करण्याबाबत ऑक्टोबर २०२४ आणि जानेवारी २०२५ मध्ये दिल्याचे उत्तर दिले. यानंतर अन्न व औषध प्रशासन विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी राज्यात सुरू असलेल्या सेव्ह ड्रग, सेव्ह फूड मोहिमेबाबत पत्रकार परिषदेत पेप्सिको, रेड बुल, स्टिंगसारख्या कंपन्या नोटीस बजावल्याची माहिती दिली. बाजारात जे तथाकथित (सो-कॉल्ड) एनर्जी डिंक्स मिळतात, या सो कॉल्ड एनर्जी ड्रिंक्सच्या कंपन्यांना एनर्जी ड्रिंक्स हा शब्द लिहता येत नाही. याबाबत अन्न व औषध प्रशासनाने ३० जून रोजी त्यांना नोटीस पाठवल्या आहेत, अशा १०-१२ कंपन्या आहेत, पेप्सिको, रेड बुल, स्टिंगसारख्या कंपन्यांना नोटीस बजावली आहे. अन्न व औषध कायद्यात Annexure A मध्ये खाद्यपदार्थांचे प्रकार आहेत. त्यात एनर्जी ड्रिंक्स असा काही प्रकार नाही", असे तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केले.

## हायकोर्टने मागितला गोरस भंडार तपासणीचा ६५ वर्षांतील रेकॉर्ड

**नागपूर :** मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने गुरुवारी वर्धा येथील गोरस भंडारवरील कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित करून अन्न व औषध प्रशासनाला फटकारले. तसेच, गेल्या ६५ वर्षांमध्ये गोरस भंडारची कितीदा तपासणी करण्यात आली,



याची नोंद ३ जुलै रोजी सादर करण्याचे निर्देश दिले. येथे उल्लेखनीय म्हणजे, प्रशासकीय अधिकारी तुकाराम मुंढे यांची या विभागाच्या आयुक्तपदी नियुक्ती झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. या कारवाईविरोधात वर्धा तहसील गो-दुग्ध उत्पादक सहकारी संघ लिमिटेड संस्थेने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. त्यावर न्यायमूर्तिद्वय अनिल किलोर व राज वाकोडे यांच्यापुढे सुनावणी झाली. संस्थेद्वारे संचालित गोरस भंडारमार्फत दररोज सुमारे ९ हजार लिटर दुधाचे संकलन व वितरण केले जाते. वर्धा जिल्ह्यातील १५ गावांमधील सुमारे ८०० कुटुंबांचा उदरनिर्वाह या माध्यमातून होतो. गेल्या ३१ मे रोजी अन्न व औषध प्रशासनाने गोरस भंडारची तपासणी केली. त्यानंतर परिसरात स्वच्छतेचा अभाव असल्याचा दावा करत गोरस भंडारला टाळे लावले. तसेच, दूध संकलन, विक्री आणि दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन पुढील आदेशापर्यंत थांबवण्याचे निर्देशही दिले. या कारवाईमुळे शेतकरी व दूध उत्पादकांचे मोठे नुकसान होत असल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला. याचिकाकर्त्यातर्फे वरिष्ठ ॲड. फिरदौस मिर्झा व ॲड. एस.के. भोयर यांनी कामकाज पाहिले. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर अन्न व औषध प्रशासनाद्वारे कारवाई केली जाते, तर कारवाई करताना कायद्याचे उल्लंघन केल्यामुळे प्रशासनाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई का करण्यात येऊ नये? अशी परखड विचारणाही न्यायालयाने यावेळी केली. तसेच, अधिकारी दोषी आढळल्यास आवश्यक कारवाई करू, असा इशारा दिला.

## दोन लाख शेतकऱ्यांची ई- केवायसीकडे पाठ...

**यवतमाळ :** जिल्ह्यात केंद्र सरकारच्या 'प्रधानमंत्री किसान सन्मान निधी' (पीएम किसान) योजनेचा लाभ घेणाऱ्या तब्बल २ लाख ६ हजारहून अधिक पात्र शेतकऱ्यांनी अद्याप 'ई-केवायसी' प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. यामुळे या शेतकऱ्यांचा आगामी हप्ता रखडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. प्रशासनाने दिलेल्या मुदतीनंतरही बहुतांश शेतकऱ्यांनी याकडे पाठ फिरवल्याने कृषी विभाग आणि जिल्हा प्रशासनाची डोकेदुखी वाढली आहे. योजनेतील पारदर्शकता वाढवणे, बोगस लाभार्थ्यांना चाप लावणे आणि केवळ पात्र व जिवंत शेतकऱ्यांपर्यंतच थेट लाभ पोहोचवणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशानुसार २० मे २०२६



पासून जिल्ह्यात ई-केवायसीसाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. मात्र, ३० जूनची अंतिम मुदत उलटून गेल्यानंतरही जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी ई-केवायसीकडे पाठ फिरविल्याचे चित्र आहे. जिल्हाधिकारी विकास मीना व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी सर्व उर्वरित शेतकऱ्यांना विलंब न करता ही प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे. ही प्रक्रिया पूर्ण न केल्यास शेतकऱ्यांना हा हप्ता मिळणार नाही.
यवतमाळ जिल्ह्यात 'पीएम किसान' योजनेचे एकूण ३ लाख ४ हजार १०६ लाभार्थी आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, त्यापैकी आतापर्यंत केवळ ९७ हजार २१८ लाभार्थ्यांनीच वार्षिक ई-केवायसी प्रमाणीकरण पूर्ण केले आहे. उर्वरित २ लाख ६ हजार ८८८ लाभार्थ्यांनी अद्याप ही प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. मुदत संपली असली तरी तांत्रिक कारणांमुळे हप्ता अडकू नये म्हणून प्रशासनाने ही प्रक्रिया सुरू ठेवली असून, शेतकऱ्यांनी सीएससी केंद्र किंवा स्वतःच्या मोबाईलवरून ही प्रक्रिया पूर्ण करणे गरजेचे आहे.

## इन्स्टाग्रामवरील आक्षेपार्ह जाहिरातींवर सरकार आक्रमक

### केंद्राकडून 'मेटा'ला समन्स

**नवी दिल्ली :** इन्स्टाग्रामवर बाल लैंगिक शोषणाशी संबंधित सामग्रीला (कंटेंट) प्रोत्साहन देणाऱ्या जाहिरातींसंदर्भात केंद्र सरकारनेमेटा कंपनीला समन्स बजावण्याचा निर्णय घेतला आहे. माध्यमांनी सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या माहितीनुसार, केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आपल्या मंत्रालयातील अधिकाऱ्यांना यासंदर्भात मेटाकडून उत्तर मागण्याचे निर्देश दिले आहेत. कोणत्याही डिजिटल व्यासपीठावर बाल लैंगिक शोषणाशी संबंधित सामग्रीचा प्रचार किंवा प्रसार होणे हा अत्यंत गंभीर प्रकार असून, यासाठी संबंधित कंपनीचे उत्तरदायित्व निश्चित केले जाईल, असे सरकारने स्पष्ट केले आहे.
मेटा कंपनीसंदर्भात केंद्र सरकारने अशा प्रकारची कडक भूमिका घेण्याची ही एका आठवड्यातील दुसरी वेळ आहे. यापूर्वी बुधवारी सरकारने व्हॉट्सॲपवरील प्रस्तावित 'युझरनेम' वैशिष्ट्यासंदर्भात मेटाला नोटीस बजावली होती. या नवीन वैशिष्ट्यामुळे ऑनलाइन फसवणूक, फिशिंग




आणि डिजिटल अटक यांसारख्या सायबर गुन्ह्यांना तसेच बनावट ओळखींद्वारे लोकांना फसवण्याच्या घटनांना प्रोत्साहन मिळेल, अशी भीती सरकारने व्यक्त केली आहे. सरकारसोबत चर्चा होईपर्यंत हे वैशिष्ट्य लागू करू नये, असे निर्देश मेटाला देण्यात आले आहेत. दरम्यान, माहिती तंत्रज्ञान कायद्याचे उल्लंघन केल्याबद्दल कंपनीवर कारवाई का केली जाऊ नये, अशी विचारणाही सरकारने संबंधित नोटिशीत केली आहे. व्हॉट्सॲप हे एक प्रमुख सोशल मीडिया मध्यस्थ असल्याने त्यावर कायद्यांतर्गत सर्व आवश्यक खबरदारी आणि उत्तरदायित्वाचे दायित्व लागू होते. याची आठवण सरकारने करून दिली आहे. सोशल मीडिया कंपन्यांनी आपल्या व्यासपीठावर बेकायदेशीर आणि हानीकारक सामग्री रोखण्यासाठी प्रभावी देखरेख यंत्रणा ठेवणे आवश्यक असल्याचे सरकारने म्हटले आहे.
यानंतर आता मेटा यावर काय उत्तर देते, हे बघावे लागेल

## मोदी-शाह हे निवडणूक लोकशाहीसाठी सर्वात मोठा धोका : काँग्रेस

**नवी दिल्ली :** सध्याचे सरकार लोकशाहीसाठी सर्वात मोठा धोका आहे, असे काँग्रेसने शुक्रवारी म्हटले. तसेच, विरोधी पक्षांनी निवडणूक प्रक्रियेत निष्पक्षता आणि उत्तरदायित्व पुनर्संचयित करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप करावा, असे आवाहन केले. अनेक विरोधी पक्षांच्या नेत्यांनी सरन्यायाधीशांना पत्र लिहिले. त्यांनी म्हटले की, जेव्हा संस्थात्मक यंत्रणा अयशस्वी होतात, तेव्हा लोकशाही अराजकतेत बदलते आणि जेव्हा न्यायपालिका



अयशस्वी होते, तेव्हा ते प्रजासत्ताकाच्या संपूर्ण विनाशाचे संकेत देते. या पक्षांनी आग्रह धरला की संपूर्ण विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) प्रक्रिया थांबवावी आणि पुढील विधानसभा निवडणुका किमान पाच वर्षांनी होणार असताना ती पुन्हा सुरू करावी. त्यांनी केंद्रीय यंत्रणांच्या कथित गैरवापराचा मुद्दा उपस्थित केला. जिथे आवश्यक असेल तिथे मतपत्रिका पुन्हा सुरू करण्याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे, असे ते म्हणाले. काँग्रेसचे महासचिव के.सी. वेणुगोपाल यांनी सरन्यायाधीशांना लिहिलेले हे पत्र X वरील एका पोस्टमध्ये शेअर केले. ते म्हणाले की, अन्याय होऊ नये आणि निवडणुकांची निष्पक्षता कायम राहावी, हे सुनिश्चित करणे सर्वोच्च न्यायालयाची जबाबदारी आहे. ते म्हणाले, आपल्या देशाच्या निवडणूक लोकशाहीला मोदी-शाह सरकारकडून सर्वात गंभीर धोका निर्माण झाला आहे. वेणुगोपाल म्हणाले की, २८ जून रोजी २४ विरोधी पक्षांनी आणि एका अपक्ष खासदाराने सरन्यायाधीशांना पत्र लिहून सदोष एसआयआर प्रक्रिया, निवडणूक आयोगाची पक्षपाती भूमिका आणि निवडणुकीशी संबंधित इतर मुद्दे अधोरेखित केले.

## सरकारविरोधी घोषणाबाजी गुन्हा नाही; नागरिक गुलाम नाहीत : मुंबई उच्च न्यायालय

**मुंबई :** सरकारच्या धोरणांविरोधात शांततापूर्ण आंदोलन करणे, निषेध नोंदवणे आणि घोषणाबाजी करणे हा प्रत्येक नागरिकाचा भारतीय संविधानाने बहाल केलेला मूलभूत अधिकार असून, केवळ अशा कारणावरून एखाद्या व्यक्तीला जिल्ह्यातून हद्दपार करता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. न्यायमूर्ती माधव जामदार यांनी एसडीपीआयचे राज्य सरचिटणीस सय्यद अहमद अब्दुल वाहिद चौधरी यांच्यावरील एका वर्षाच्या हद्दपारीचा आदेश रद्द करताना पोलिसांच्या कारवाईवर तीव्र नाराजी व्यक्त केली.
चौधरी यांनी नागरिकत्व सुधारणा कायदा (CAA) आणि ज्ञानवापी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर विविध आंदोलनांमध्ये सहभाग घेतला होता. या आंदोलनांशी संबंधित पाच गुन्ह्यांच्या आधारे मुंबई पोलिसांनी त्यांच्याविरुद्ध हद्दपारीचा आदेश जारी केला होता. या आदेशाविरोधात त्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सुनावणीदरम्यान न्यायालयाने पोलिसांना कठोर शब्दांत सुनावले. सरकारच्या



निर्णयांविरोधात नागरिक आंदोलन का करू शकत नाहीत, असा सवाल उपस्थित करत न्यायमूर्ती **जामदार यांनी, 'नागरिकांना भारत सरकारचे गुलाम बनवले जात आहे का? आंदोलन करणे आणि निषेध नोंदवणे हा नागरिकांचा घटनात्मक अधिकार आहे. पोलीस हे मुख्यमंत्री किंवा पंतप्रधानांचे नोकर नसून ते जनतेचे लोकसेवक आहेत,'** असे तोंडी निरीक्षण नोंदवले. तसेच, 'भाजप सरकार मुर्दाबाद' किंवा 'अमित शाह मुर्दाबाद' अशा घोषणा देणे, केवळ त्यावरून हद्दपारीची कारवाई करण्याचा आधार ठरू शकत नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. अंतिम आदेशात न्यायालयाने नमूद केले की, केवळ सरकारी निर्णयांविरोधात आंदोलन करणे किंवा घोषणाबाजी करणे हा हद्दपारीचा कायदेशीर आधार ठरू शकत नाही. अशी कारवाई भारतीय संविधानातील अनुच्छेद १९ अंतर्गत अभिव्यक्ती स्वातंत्र्य, शांततापूर्ण आंदोलनाचा अधिकार आणि अनुच्छेद २१ अंतर्गत जीवन व वैयक्तिक स्वातंत्र्याच्या अधिकाराचे उल्लंघन करणारी आहे. त्यामुळे संबंधित हद्दपारीचा आदेश रद्द करण्यात आला.
हा निर्णय लोकशाही व्यवस्थेत नागरिकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे महत्त्व अधोरेखित करणारा असून, सरकारविरोधी मत व्यक्त करणे हा गुन्हा नसल्याचा स्पष्ट संदेश देणारा ठरला आहे.

### ठळक मुद्दे

- सरकारविरोधी घोषणाबाजी हा हद्दपारीचा आधार ठरू शकत नाही.
- आंदोलन व निषेध हा नागरिकांचा घटनात्मक अधिकार.
- पोलीस हे सरकारचे नव्हे, तर जनतेचे लोकसेवक.
- हद्दपारीचा आदेश रद्द; अनुच्छेद १९ व २१ चे संरक्षण अधोरेखित.


PROPERTY FOR RENT/ LEASE

AVAILABLE ON RENT/ LEASE AT PRIME LOCATION

COMMERCIAL PROPERTY

Total Plot Area: 50,000 Sq.Ft.

Constructed Area: 30,000 Sq.Ft.

LOCATION: WELA (HARI), SHANKARPUR ROAD

IDEAL FOR

- Hostel/ Student Accommodation
- New College/ Educational Institution
- Residential College Campus
- Car/ Motorcycle Showroom
- Warehouse / Godown
- Supermarket (D-Mart Type)

CONTACT

DR. KAMBLE: 9422539451

“ अशक्य काहीच नसते,
केवळ आपली इच्छाशक्ती हवी... ”



# संपादकीय

## जागतिक कोंडीत भारत?

एखाद्या राष्ट्राची उंची केवळ त्याच्या अर्थव्यवस्थेने किंवा लष्करी सामर्थ्याने मोजली जात नाही. त्या राष्ट्रावर जगाचा किती विश्वास आहे, त्याचे मित्रदेश किती ठामपणे त्याच्या पाठीशी उभे राहतात, त्याचे शब्द किती विश्वासार्ह मानले जातात आणि त्याची लोकशाही किती मजबूत आहे, यावर त्या राष्ट्राची खरी प्रतिष्ठा ठरते. भारताने स्वातंत्र्यानंतर अनेक दशकांत संयमी, संतुलित आणि विश्वासार्ह परराष्ट्र धोरणामुळे जगात स्वतंत्र ओळख निर्माण केली. परंतु गेल्या काही वर्षांत काही घटनांमुळे भारताच्या परराष्ट्र धोरणावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. सरकार याला यशस्वी कूटनीती म्हणत असले, तरी टीकाकारांच्या मते भारताला अनेक प्रसंगी अनावश्यक राजनैतिक दबावाला सामोरे जावे लागले आहे. सर्वप्रथम कॅनडाबरोबरचा वाद पाहिला तर दोन्ही देशांतील संबंध अभूतपूर्व तणावाच्या टप्प्यावर पोहोचले. कॅनडाने एका शीख नेत्याच्या हत्येबाबत भारतीय एजंटांचा संभाव्य संबंध असल्याचा आरोप केला, तर भारताने हे आरोप ठामपणे फेटाळले आणि कॅनडावर दहशतवादाबाबत दुहेरी भूमिका घेतल्याचा आरोप केला. दोन्ही देशांनी राजनैतिक अधिकाऱ्यांची हकालपट्टी केली, व्हिसा सेवा प्रभावित झाली आणि परस्पर विश्वासाला धक्का बसला. प्रश्न असा आहे की, जगातील दोन लोकशाही राष्ट्रांमध्ये संवादाऐवजी अविश्वासाची परिस्थिती का निर्माण झाली? दुसरे उदाहरण म्हणजे अमेरिकेतील कथित हत्येच्या कटाशी संबंधित प्रकरण. अमेरिकेच्या न्याय विभागाने आरोपपत्र दाखल केल्यानंतर भारताने अंतर्गत चौकशी सुरू केली. भारताने या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहिले, ही सकारात्मक बाब आहे. मात्र अशा संवेदनशील आरोपांमुळे भारताच्या प्रतिमेवर चर्चा झाली, हेही तितकेच खरे आहे. भारत-अमेरिका संबंध मजबूत राहिले असले, तरी अशा घटना परराष्ट्र धोरणासाठी सावधगिरीचा इशारा देतात. चीनबरोबरचा सीमावाद हे तिसरे आणि सर्वात गंभीर उदाहरण आहे. गलवान खोऱ्यातील संघर्षानंतर भारताने चीनविरोधात कठोर भूमिका घेतली; मात्र प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील तणाव पूर्णपणे निवळलेला नाही. सीमावर्ती भागात चीनची पायाभूत सुविधा वाढत असल्याच्या बातम्या सातत्याने समोर येतात. प्रश्न असा विचारला जातो की, मजबूत नेतृत्वाच्या दाव्यांनंतरही सीमा प्रश्न दीर्घकाळ का प्रलंबित आहेत? शेजारी देशांशी संबंध हा भारताच्या सुरक्षेचा कणा आहे. मालदीवमध्ये काही काळ 'India Out' आंदोलनाला राजकीय पाठबळ मिळाले. नेपाळने सीमावादाचा मुद्दा उचलला. बांगलादेशाशी पाणीवाटप आणि सीमा व्यवस्थापनासारखे प्रश्न कायम आहेत. श्रीलंकेतील आर्थिक संकटात भारताने मोठी मदत केली, परंतु दक्षिण आशियात चीनचा वाढता प्रभाव रोखण्याचे आव्हान अद्याप कायम आहे. या घडामोडी भारताने शेजारी देशांशी अधिक सातत्यपूर्ण आणि दीर्घकालीन विश्वासाचे संबंध निर्माण करण्याची गरज अधोरेखित करतात. परराष्ट्र धोरणात भाषणांपेक्षा परिणाम महत्त्वाचे असतात. देशांतर्गत राजकारणात आक्रमक भाषा लोकप्रिय ठरू शकते; पण आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये संयम, विश्वास आणि सातत्य यांनाच अधिक किंमत असते. जागतिक राजकारणात कायमस्वरूपी मित्र किंवा शत्रू नसतात; कायमस्वरूपी असतात ते राष्ट्रीय हित. म्हणूनच परराष्ट्र धोरणाला पक्षीय राजकारणापेक्षा राष्ट्रहिताच्या चौकटीत पाहणे आवश्यक आहे. भारताची प्रतिमा केवळ सरकारच्या घोषणांनी तयार होत नाही. जग भारताकडे त्याच्या लोकशाही संस्था, न्यायव्यवस्था, प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य, धार्मिक सहिष्णुता आणि संविधानिक मूल्यांच्या आधारेही पाहते. विविध आंतरराष्ट्रीय अहवालांनी वेळोवेळी या विषयांवर चिंता व्यक्त केली आहे. त्या अहवालांशी मतभेद असू शकतात; परंतु त्यांना फेटाळण्यापेक्षा भारताने आपल्या संस्थांची विश्वासार्हता अधिक मजबूत करण्यावर भर दिला पाहिजे. हेही तितकेच सत्य आहे की भारताने अनेक उल्लेखनीय यश मिळविले आहेत. G20 अध्यक्षपद यशस्वीपणे पार पाडणे, जागतिक दक्षिण देशांचा आवाज बुलंद करणे, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांचे मॉडेल जगासमोर मांडणे, आपत्तीच्या काळात अनेक देशांना मदत करणे आणि संरक्षण व तंत्रज्ञान क्षेत्रात भागीदारी वाढविणे ही भारताची महत्त्वाची कामगिरी आहे. म्हणूनच परराष्ट्र धोरणाचे मूल्यांकन करताना यश आणि अपयश या दोन्ही बाजू वस्तुनिष्ठपणे पाहणे आवश्यक आहे. तथापि, कोणत्याही सरकारने हे लक्षात ठेवले पाहिजे की आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा ही प्रचाराने नव्हे, तर विश्वासाने निर्माण होते. जगाला प्रभावी भाषणांइतकीच पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि सातत्यपूर्ण कृती अपेक्षित असते. भारत हा १४० कोटी जनतेचा देश आहे; त्याची प्रतिष्ठा कोणत्याही एका पक्षाची मालमत्ता नाही. ती जपण्याची जबाबदारी प्रत्येक सरकारवर असते. आज गरज आहे ती आत्मपरीक्षणाची. परराष्ट्र धोरणात संवादाला प्राधान्य, शेजाऱ्यांशी विश्वास, जागतिक भागीदारांशी पारदर्शक सहकार्य आणि संविधानिक मूल्यांशी दृढ बांधिलकी या चार आधारस्तंभांवर भारताने पुढे वाटचाल केली, तर भारताची जागतिक प्रतिमा अधिक बळकट होईल. लोकशाहीत सरकारला कठोर प्रश्न विचारणे म्हणजे राष्ट्राचा अपमान नव्हे; उलट राष्ट्र अधिक सक्षम व्हावे, हीच त्यामागची भावना असते. परराष्ट्र धोरणातील प्रत्येक यशाचे स्वागत व्हावे, पण प्रत्येक त्रुटीवर प्रामाणिक चर्चा देखील व्हावी. कारण भारताची आन, बान आणि शान घोषणांनी नव्हे, तर जगाच्या विश्वासाने उंचावते. तो विश्वास टिकविणे हीच कोणत्याही सरकारची सर्वात मोठी परीक्षा आहे. ●●

## अनुसूचित जातींमधील उप-वर्गीकरण संविधानाला धरून की संविधानाविरोधात?




आरक्षण उपवर्गीकरनावर न्यायमूर्ती बेला त्रिवेदी यांचे कालचे स्पष्ट मत : अनुसूचित जातींमधील उप-वर्गीकरण म्हणजे नेमके काय आणि त्याचा धोका काय? अनुसूचित जातींमधील उप-वर्गीकरण संविधानाला धरून की संविधानाविरोधात? हे काही मुद्दे कमी आणि समजेल अश्या शब्दात मांडण्याचा प्रयत्न आहे. सोप्या भाषेत सांगायचे तर,अनुसूचित जातींना संविधानाने एकत्रितपणे आरक्षणाचा हक्क दिला आहे, कारण या सर्व समाजांनी शतकानुशतके अस्पृश्यता आणि सामाजिक अन्याय सहन केला आहे. हा हक्क जाती-जातीत विभागून देण्यासाठी नाही. सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती बेला एम. त्रिवेदी यांनी स्पष्ट मत मांडले की संविधानाच्या अनुच्छेद 341 नुसार अनुसूचित जातींची यादी एकसंध आहे. राज्य सरकारांना त्यात उप-वर्गीकरण करून “या जातीला जास्त, त्या जातीला कमी” असे ठरवण्याचा अधिकार नाही. हे समजण्यासाठी एक साधे उदाहरण, समजा एका घरातील 5 भावांना वडिलांनी समान हक्काने जमीन दिली. आता बाहेरचा कुणीतरी येऊन म्हणाला की “मोठ्या भावाला जास्त, लहानाला कमी” तर तो वडिलांच्या निर्णयात हस्तक्षेपच ठरेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनुसूचित जातींना दिलेले आरक्षण हे प्रतिनिधित्व आणि ऐतिहासिक न्यायासाठी आहे, अंतर्गत फूट पाडण्यासाठी नाही. उप-वर्गीकरणाच्या नावाखाली SC समाजाला तुकड्यांत विभागण्याचा प्रयत्न झाला, तर त्याचा सर्वात मोठा फटका सामूहिक राजकीय आणि सामाजिक ताकदीला बसेल. आज गरज आहे ती हक्क टिकवण्याची, एकजूट मजबूत करण्याची आणि संविधानाचा मूळ हेतू समजून घेण्याची. विभाजन नव्हे, संघटन हाच मार्ग आहे. तसेच, डॉ. बाबासाहेबांनी संविधानातून दिलेला हक्क हा सर्व अनुसूचित जातींसाठी समान न्यायाच्या तत्त्वावर आहे. दुसरे उदाहरण - जर एका संघाची ताकद 100 लोकांची असेल आणि त्यांना 10-10 च्या गटात भागून एकमेकांविरुद्ध उभे केले, तर त्या संघाची ताकद कमी होते. उप-वर्गीकरणाचे राजकारण हे असेच काम करते, एकजूट तोडते. लक्षात ठेवा, आरक्षण हा दयेचा विषय नाही; तो ऐतिहासिक अन्यायाची भरपाई आहे. आज जर आपण “आपली जात वेगळी, आपला हिस्सा वेगळा” म्हणत विभागलो, तर उद्या संपूर्ण आरक्षण व्यवस्थेलाच कमकुवत करण्याचा मार्ग मोकळा होईल. हक्क टिकवायचे असतील तर एकत्र राहावे लागेल. विभाजनाच्या राजकारणाला बळी पडू नका. संविधान वाचा, समजा आणि हक्कांसाठी सजग राहा. ●●



सागर रामभाऊ तायडे
9920403859

भारतीय राज्यघटनेने अनुसूचित जातीं, जमाती व इतर मागास जातीना आरक्षणाची तरतूद करून शतकानुशतके सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित राहिलेल्या समाजघटकांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. आरक्षण ही कोणतीही दानधर्माची व्यवस्था नसून ऐतिहासिक अन्यायाची अंशतः भरपाई करण्यासाठी स्वीकारलेले संविधानिक साधन आहे. या व्यवस्थेमुळे लाखो कुटुंबांचे जीवनमान उंचावले, शिक्षण व रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आणि समाजातील अनेक घटकांना सन्मानाने जगण्याचा अधिकार प्राप्त झाला. मात्र अलीकडील काळात अनुसूचित जातींमधील आरक्षणाच्या उपवर्गीकरणाचा मुद्दा पुन्हा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. या प्रश्नाकडे केवळ प्रशासकीय अथवा राजकीय विषय म्हणून पाहून चालणार नाही; कारण त्याचा संबंध सामाजिक न्यायाबरोबरच सामाजिक ऐक्याशीही आहे. उपवर्गीकरणाचे समर्थक असा युक्तिवाद करतात की अनुसूचित जातींसाठी उपलब्ध असलेल्या आरक्षणाचा लाभ काही जातींपुरताच अधिक प्रमाणात मर्यादित राहिला आहे. त्यामुळे आरक्षणाचे लाभ सर्वात मागास आणि वंचित घटकांपर्यंत पोहोचण्यासाठी उपवर्गीकरण आवश्यक आहे. सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून हा विचार नक्कीच गांभीर्याने विचारात घेण्यासारखा आहे. कोणत्याही कल्याणकारी धोरणाचा लाभ समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचणे ही लोकशाहीची अपेक्षा असते. तथापि, या चर्चेच्या पुढे जाऊन एक मूलभूत प्रश्न विचारणे आवश्यक आहे. अनुसूचित जातींमधील कोणत्या घटकाला आरक्षणाचा अधिक लाभ मिळाला याचा आढावा घेतला जात असताना, भारतीय समाजव्यवस्थेत हजारो वर्षांपासून शिक्षण, जमीन, संपत्ती, सत्ता, व्यापार आणि सामाजिक प्रतिष्ठा यांवर कोणत्या घटकांचे वर्चस्व राहिले आणि त्याचा लाभ कोणाला मिळत राहिला, याचाही वस्तुनिष्ठ विचार होणे गरजेचे आहे. आरक्षणाची निर्मिती ही समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी झाली. त्यामुळे आरक्षणाचा लाभ कोणाला किती मिळाला याचे विश्लेषण करताना समाजातील इतर घटकांना पिढ्यान् पिढ्या उपलब्ध असलेल्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक भांडवलाचाही विचार करणे आवश्यक ठरते. आजही गुणवत्तेच्या, स्पर्धेच्या आणि समान संधींच्या चर्चा होत असल्या तरी सर्वजण एकाच प्रारंभरेषेवर उभे नाहीत, हे वास्तव दुर्लक्षित करता येत नाही. म्हणूनच आरक्षणाच्या लाभांचे वितरण हा महत्त्वाचा विषय असला, तरी सामाजिक व ऐतिहासिक विषमतेची मूळ कारणे कोणती आहेत, यावर अधिक व्यापक चिंतन होणे आवश्यक आहे. अन्यथा चर्चा केवळ वंचित समाजातील अंतर्गत वाटपापुरती मर्यादित राहील आणि विषमतेच्या मूळ संरचनेकडे दुर्लक्ष होईल. या संदर्भात एक जुनी गोष्ट आठवते. दोन मांजरींना एक भाकर सापडते. तिचे समान वाटप कसे करावे यावर त्यांच्यात वाद निर्माण होतो. न्यायासाठी त्या एका माकडाकडे जातात. माकड भाकर दोन भागांत विभागते; पण एक भाग मोठा आणि दुसरा लहान असल्याचे सांगून ते मोठ्या भागातून थोडे खाते. त्यानंतर दुसरा भाग मोठा वाटू लागल्याचे सांगून त्यातूनही थोडे खाते. समानतेच्या नावाखाली हा क्रम सुरू राहतो आणि अखेरीस संपूर्ण भाकर माकडाच्या पोटात जाते; मांजरींच्या वाट्याला मात्र काहीच उरत नाही. अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणावरील चर्चेकडे पाहताना अनेकांना या गोष्टीची आठवण होणे स्वाभाविक आहे. कोण मागे राहिला, कोणाला अधिक लाभ मिळाला यावर चर्चा व्हायलाच हवी; परंतु त्या चर्चेच्या निमित्ताने समाजात परस्पर संशय, वैमनस्य आणि संघर्ष निर्माण होत नाही ना, याचाही विचार करावा लागेल. सामाजिकदृष्ट्या वंचित घटक एकमेकांविरुद्ध उभे ठाकले, तर त्यांची सामूहिक ताकद क्षीण होते. परिणामी ऐतिहासिकदृष्ट्या बलवान घटकांचे वर्चस्व कायम राहण्याची शक्यता वाढते. जर खरोखरच सर्वात मागास घटकांपर्यंत संधी पोहोचविण्याची प्रामाणिक भावना असेल, तर केवळ अनुसूचित जातींच्या अंतर्गत वाटपावर लक्ष केंद्रित करून चालणार नाही. समाजातील संधी, संसाधने, शिक्षण, सत्ता आणि आर्थिक भांडवल यांचे ऐतिहासिक वितरण कसे झाले, याचाही गंभीरपणे विचार व्हायला हवा. हजारो वर्षे सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक लाभ उपभोगणाऱ्या घटकांच्या संरचनात्मक वर्चस्वावर चर्चा न करता केवळ अनुसूचित जातींतील वाटपावर भर दिल्यास सामाजिक न्यायाचे चित्र अपूर्ण राहील. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला ‘शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा’ हा संदेश कोणत्याही एका जातीपुरता मर्यादित नव्हता; तो संपूर्ण वंचित समाजाच्या उन्नतीचा मार्ग होता. त्यामुळे सामाजिक न्यायाच्या नावाखाली वंचित समाजात नवीन भिंती उभ्या राहू नयेत, याची काळजी घेणे ही काळाची गरज आहे. सामाजिक न्यायाचा खरा अर्थ वंचितांमध्ये परस्पर स्पर्धा निर्माण करणे नसून, सर्वात शेवटच्या घटकापर्यंत विकासाच्या संधी पोहोचविणे हा आहे. त्यामुळे आरक्षणाच्या उपवर्गीकरणावरील चर्चा ही विभाजनाची नव्हे, तर सामाजिक न्याय, समता आणि बंधुता अधिक मजबूत करण्याची संधी म्हणून पाहिली गेली पाहिजे. अनुसूचित जातींमध्ये फूट निर्माण करण्याऐवजी व्यापक ऐक्य, संवाद आणि परस्पर सहकार्याची भावना दृढ करणे हेच आजच्या काळातील सर्वात मोठे सामाजिक उत्तरदायित्व आहे. अखेर प्रश्न केवळ आरक्षणाच्या वाटपाचा नाही; प्रश्न आहे सामाजिक न्यायाचा, संविधानिक मूल्यांचा आणि वंचित समाजाच्या सामूहिक भविष्याचा. म्हणूनच उपवर्गीकरणाच्या कोणत्याही चर्चेत न्याय आणि समतेइतकेच सामाजिक ऐक्याचे मूल्यही जपले गेले पाहिजे. ●●

## आरक्षण उपवर्गीकरण सामाजिक न्याय की सामाजिक विघटन?






प्रा. डॉ. निरज नगराळे
मो.94217 24647

## आर्थिक नियोजनाची आवश्यकता : आर्थिक स्वातंत्र्याकडे नेणारी यशाची गुरुकिल्ली

आजचे युग वेगवान, स्पर्धात्मक आणि अनिश्चिततेने भरलेले आहे. वाढती महागाई, शिक्षण व आरोग्यसेवेचा वाढता खर्च, बदलती जीवनशैली आणि भविष्यातील आर्थिक आव्हाने यामुळे केवळ पैसा कमावणे पुरेसे राहिलेले नाही. प्रत्येक व्यक्ती आणि कुटुंबासाठी उत्पन्नाचे योग्य नियोजन करणे ही आता गरज नसून अपरिहार्यता बनली आहे. अनेक लोक आयुष्यभर परिश्रम करून चांगले उत्पन्न मिळवतात; मात्र आर्थिक नियोजनाच्या अभावामुळे ते आर्थिक सुरक्षितता आणि संपत्ती निर्माण करण्यात मागे पडतात. याउलट, मर्यादित उत्पन्न असलेली व्यक्तीही शिस्तबद्ध बचत, योग्य गुंतवणूक आणि दूरदृष्टीच्या बळावर आर्थिकदृष्ट्या सक्षम व स्वावलंबी जीवन जगू शकते. म्हणूनच, ‘उत्पन्न संपत्ती निर्माण करत नाही; योग्य आर्थिक नियोजन संपत्ती निर्माण करते,’ हे विधान अत्यंत समर्पक ठरते. आर्थिक नियोजन म्हणजे आपल्या उत्पन्नाचा योग्य वापर करून खर्च, बचत, गुंतवणूक, विमा आणि कर नियोजन यांचे सुयोग्य व्यवस्थापन करत अल्पकालीन व दीर्घकालीन आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्याची प्रक्रिया होय. सोप्या शब्दांत सांगायचे झाल्यास, आजच्या उत्पन्नातून उद्याच्या गरजांची तयारी करणे म्हणजे आर्थिक नियोजन. आज देशातील सरासरी महागाई दर सुमारे सहा टक्के असला, तरी शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रातील खर्च लक्षात घेतल्यास अनेक कुटुंबांसाठी प्रत्यक्ष महागाई दहा टक्क्यांपर्यंत पोहोचते. त्यामुळे गुंतवणूक अशी असावी की ती केवळ भांडवल सुरक्षित ठेवणार नाही, तर महागाईवरही मात करेल. महिन्याला पन्नास हजार रुपये कमावणारी व्यक्ती आर्थिक अडचणीत असू शकते, तर चाळीस हजार रुपये कमावणारी व्यक्ती योग्य नियोजनामुळे आर्थिकदृष्ट्या सुरक्षित आणि समाधानी जीवन जगू शकते. यावरून आर्थिक स्थैर्य हे उत्पन्नाच्या रकमेवर नव्हे, तर त्याच्या योग्य व्यवस्थापनावर अवलंबून असल्याचे स्पष्ट होते. योग्य आर्थिक नियोजनामुळे आर्थिक शिस्त निर्माण होते, अनपेक्षित संकटांना तोंड देणे सोपे जाते, मुलांचे शिक्षण व विवाह यांसारखी महत्त्वाची उद्दिष्टे पूर्ण करता येतात, तसेच निवृत्तीनंतरही आर्थिक स्वावलंबन टिकवून ठेवता येते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आर्थिक तणाव कमी होऊन सन्मानाने आणि आत्मविश्वासाने जीवन जगता येते. आर्थिक नियोजन प्रभावी ठरण्यासाठी स्पष्ट उद्दिष्टे निश्चित करणे अत्यावश्यक आहे.




अल्पकालीन (१ ते ३ वर्षे), मध्यमकालीन (३ ते ६ वर्षे) आणि दीर्घकालीन (६ वर्षांपेक्षा अधिक) अशा कालावधीनुसार उद्दिष्टांचे वर्गीकरण करून त्यानुसार गुंतवणूक करणे आवश्यक असते. आपत्कालीन निधी, मुलांचे शिक्षण, घर खरेदी, निवृत्ती नियोजन यांसारख्या सर्व गरजा या प्रक्रियेत समाविष्ट होतात. यासाठी '५०-३०-२०' हा नियम अत्यंत उपयुक्त मानला जातो. या नियमानुसार उत्पन्नाचा ५० टक्के भाग आवश्यक खर्चासाठी, ३० टक्के भाग वैयक्तिक गरजा व इच्छांसाठी आणि किमान २० टक्के भाग बचत व गुंतवणुकीसाठी राखून ठेवला जातो. या सवयीमुळे आर्थिक शिस्त निर्माण होते आणि भविष्यासाठी भक्कम पाया तयार होतो. गुंतवणूक करताना उत्पन्न, उद्दिष्टे, कालावधी आणि जोखीम स्वीकारण्याची क्षमता यांचा विचार करणे आवश्यक आहे. बँक मुदत ठेवी आणि पोस्ट ऑफिस योजना भांडवल सुरक्षित ठेवतात; मात्र त्यांचा परतावा महागाईच्या तुलनेत मर्यादित असतो. सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी (PPF) हा करसवलतीसह दीर्घकालीन बचतीसाठी उत्कृष्ट पर्याय आहे. राष्ट्रीय पेन्शन योजना (NPS) निवृत्ती नियोजनासाठी उपयुक्त असून त्यामध्येही करसवलतीचा लाभ मिळतो. म्युच्युअल फंड हे व्यावसायिक व्यवस्थापन, विविधीकरण आणि चक्रवाढीच्या फायद्यामुळे दीर्घकालीन संपत्ती निर्मितीसाठी प्रभावी साधन मानले जाते. शेअर बाजारात दीर्घकालीन संपत्ती निर्माण करण्याची मोठी क्षमता असली, तरी त्यामध्ये जोखीम आणि अस्थिरता अधिक असते. त्यामुळे बाजाराचा अभ्यास, कंपन्यांची आर्थिक स्थिती, उद्योगातील बदल आणि स्वतःची जोखीम क्षमता लक्षात घेऊनच शेअर बाजारात गुंतवणूक करावी. सोन्यातील गुंतवणूक महागाईपासून संरक्षण देते; मात्र नियमित उत्पन्न मिळत नाही. स्थावर मालमत्तेमध्ये भांडवल वाढीबरोबर भाडे उत्पन्नाची संधी मिळते; परंतु त्यासाठी मोठ्या भांडवलाची आवश्यकता असते आणि ती तुलनेने कमी तरल असते. गुंतवणुकीइतकाच विमाही आर्थिक नियोजनाचा महत्त्वाचा भाग आहे. जीवन विमा, आरोग्य विमा आणि टर्म इन्शुरन्स हे कुटुंबाच्या आर्थिक सुरक्षिततेसाठी अत्यावश्यक आहेत. विशेषतः कमी वयात घेतलेला टर्म इन्शुरन्स कमी प्रीमियममध्ये मोठे संरक्षण देतो. त्याचप्रमाणे वाढत्या वैद्यकीय खर्चाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विमा अत्यंत आवश्यक ठरतो. गंभीर आजार किंवा शस्त्रक्रियेमुळे अनेक वर्षांची बचत काही दिवसांत खर्च होऊ शकते. अशावेळी आरोग्य विमा मोठा आर्थिक आधार ठरतो. गुंतवणुकीतील आणखी एक महत्त्वाचा नियम म्हणजे विविधीकरण. ‘सर्व अंडी एका टोपलीत ठेवू नका’ ही म्हण गुंतवणुकीलाही तितकीच लागू पडते. सर्व पैसा एकाच साधनात गुंतविण्याऐवजी विविध पर्यायांमध्ये विभागून गुंतविल्यास जोखीम कमी होते आणि परताव्याचा समतोल राखता येतो. देशांतर्गत गुंतवणुकीबरोबरच काही प्रमाणात आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत गुंतवणूक केल्यास जागतिक आर्थिक वाढीचाही लाभ मिळू शकतो. आजच्या काळात केवळ बचत करून आर्थिक उद्दिष्टे साध्य करणे कठीण झाले आहे. त्यामुळे महागाईवर मात करण्यासाठी आणि दीर्घकालीन संपत्ती निर्माण करण्यासाठी म्युच्युअल फंडातील सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन (SIP) हा प्रभावी पर्याय मानला जातो. एसआयपीची विशेष बाब म्हणजे अगदी कमी रकमेपासून गुंतवणूक सुरू करता येते. दरमहा शंभर, पाचशे किंवा हजार रुपयांपासून सुरुवात करूनही दीर्घ कालावधीत चक्रवाढीच्या शक्तीमुळे मोठा निधी तयार होऊ शकतो. वेळ हा गुंतवणूकदाराचा सर्वात मोठा मित्र असून चक्रवाढ ही त्याची सर्वात मोठी ताकद आहे. दीर्घकालीन कालावधीत इक्विटी आधारित म्युच्युअल फंडांनी महागाईपेक्षा अधिक परतावा देण्याची क्षमता सिद्ध केली आहे. त्यामुळे भविष्यासाठी भक्कम आर्थिक पाया उभारण्यासाठी एसआयपी हा अत्यंत उपयुक्त पर्याय ठरतो. आर्थिक नियोजन म्हणजे केवळ पैसे वाचवणे किंवा गुंतवणूक करणे नव्हे, तर स्वतःचे, कुटुंबाचे आणि भविष्यातील स्वप्नांचे संरक्षण करण्याची जबाबदारी स्वीकारणे होय. संपत्ती निर्माण करण्यासाठी योग्य गुंतवणूक जितकी आवश्यक आहे, तितकाच विमाही महत्त्वाचा आहे. आज केलेली शिस्तबद्ध बचत, योग्य गुंतवणूक आणि आवश्यक विमा हे उद्याच्या आर्थिक स्वातंत्र्याचे भक्कम बीज आहे. पैसा कमावणे ही कला असली, तरी तो टिकवणे, वाढवणे आणि योग्यवेळी योग्य कारणासाठी वापरणे ही आर्थिक नियोजनाची खरी विद्या आहे. ही विद्या आत्मसात करणारी व्यक्तीच खऱ्या अर्थाने आर्थिकदृष्ट्या समृद्ध, सुरक्षित आणि स्वावलंबी जीवन जगू शकते. ●●



डॉ. विशाखा मेश्राम
मो. 9850271948

## बहुजनांच्या बेशिस्त चळवळी कशा प्रगत होणार?




बहुजनांच्या चळवळी शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, प्रबोधनाच्या असोत अथवा राजकीय - सर्वच क्षेत्रांत बेशिस्तपणा मोठ्या प्रमाणात जाणवतो. या चळवळींमध्ये निष्ठा हा केवळ दिखावा ठरतो. राहुल गांधींची पदयात्रा असो, लोकांची गर्दी स्वागतासाठी उसळते, पण कार्यकर्ता सेल्फीत खुश! राष्ट्रभक्तीचा दिखावा मोठा करीत शासकीय यंत्रणेविरोधात अथवा सत्ताधाऱ्यांविरोधात आंदोलन करताना “माझा फोटो प्रसारमाध्यमात यावा” म्हणून चढाओढ लागते. एकाचे तोंड, दुसऱ्याचा हात, तिसऱ्याचा पाय - फोटोचा सत्यानाश होतो. एखाद्या सत्कार समारंभात व्यासपीठावर उपस्थित प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते अथवा आयोजकांतील ज्येष्ठांच्या हस्ते सत्कार, स्वागत होणे हा योग्य पायंडा आहे. पण व्यासपीठावर उपस्थित सर्वजण गुलदस्त्याला करंट लागल्यासारखे हात लावतात. शेवटचा गडी सर्वांना दाबत हात लावून कॅमेऱ्याकडे तोंड करतो. हे करायला व्यासपीठावरचे काही ‘शहाणे’ भाग पाडतात. ना कोणाचे धड तोंड, ना धड शरीराचा भाग फोटोत दिसतो. सुशिक्षितांना हा बेशिस्तपणा खरेच कळत नसावा का?

**धार्मिक-सामाजिक आयोजनातील बेशिस्त :** धार्मिक आयोजनातील गर्दी, मग ते प्रवचन असो, कीर्तन असो, यात्रा असो, धार्मिक स्थळांचे दर्शन असो, प्रत्येक ठिकाणी गर्दीची बेशिस्त चेंगराचेंगरीत मृत्यूपर्यंत पोहोचते. तरी शिस्त आम्हाला कळत नाही? महापुरूषांच्या प्रतिमेला हार चढवतांना गळफास लावल्यासारखे बेसाईज हार त्याचे फोटो प्रसिद्धी माध्यमातून आपण प्रसारीत करतो. सामाजिक कार्य करताना आमचा सेवाभाव कमी आणि दिखावाच मोठ्या प्रमाणात दिसतो. आरोग्यसेवेच्या रांगा, महाप्रसादाच्या रांगा, तेथील अस्वच्छता पाहिल्यानंतर आपण कुठल्या समाजसेवेचा आदर्श लोकांसमोर ठेवतो? महाप्रसादातील पत्रावळी, कागदी प्लेट्स, प्लास्टिक ग्लास, वाट्या अस्ताव्यस्त वाऱ्याने उडतात. त्यामुळे सार्वजनिक आरोग्य बिघडते, याची चिंता किती समाजसेवकांना असते? अन्नाची नासाडी आणि ते खाल्ल्यामुळे पाळीव प्राण्यांचे होणारे मृत्यू याची चिंता किती भाविकांना असते? धार्मिक स्थळांवर आमच्या भाविकतेच्या प्रदर्शनातून मध, दही, दुधाचे, शुद्ध पाण्याचे, तेलाचे लोट वाया जातात. कुठल्याच सजीवांना हे सात्विक अन्न उपयोगी येत नाही. याची साधी अक्कल सुशिक्षितांना येत नाही? या बेशिस्तीतून कुठल्या श्रद्धा आम्ही जोपासतो? खूपदा तर मानवाचे अन्न आम्ही उपाशी माणसाला न देता प्राण्यांना जबरदस्तीने चारण्याचा प्रयत्न करतो. त्यातून पाळीव प्राण्यांचे आरोग्य बिघडवण्यास आम्ही दोषी ठरत नाही का?

**त्यांची शिस्त अभ्यासा!** पण काही मूठभरांचे राजकीय पक्ष, सामाजिक संघटना अल्पकाळात भारतीय समाजजीवनात रुजल्या आणि अनभिषिक्त राज्यकर्ते म्हणून देशव्यापी बनल्या. याला कारण त्यांच्या कार्यकर्त्यांत असलेली शिस्त हे सर्वात महत्त्वाचे आहे. त्यांची व्यापकता अभ्यासाचा विषय आहे. विचार पटत नसला तरीही !बहुजनांच्या चळवळीत जर वक्ता पोडीयमवर बोलत असेल तर पोडीयमसभोवतालची गर्दी फोटो निघावा म्हणून तोंड मध्ये-मध्ये घालणाऱ्या कार्यकर्त्यांची बेशिस्त पाहण्यासारखी असते. व्यासपीठावर कोणी बसावे याची चढाओढ, व्यासपीठावर उभे राहणाऱ्यांची गर्दी बरेचदा अपघाताला कारण ठरते.

**आंदोलनातील बेशिस्त :** सेल्फी काढण्याची चढाओढ, हसणे, खिदळणे मर्यादेबाहेरची बेशिस्त जणू त्या आंदोलनाचा आत्माच मारून टाकते. मग प्रसिद्धी माध्यमांच्या बातम्यांमध्ये “माझे नाव का नाही?” यावर रामायण, महाभारत घडते आणि त्या चळवळीचे तुकडे-तुकडे होऊन जातात. मित्रांनो, चळवळी मानवी कल्याणासाठी असतात. शिस्तीने त्या मोठ्या होऊन जनकल्याणासाठी राबवल्या जाव्यात, तरच जीवनाचा आनंद घेता येतो. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज मानवी कल्याणाचा विचार मांडताना लिहितात :- ‘बौद्धिक गुलामगिरीचे निवारण हेच खरे स्वातंत्र्य!’ “प्रिय बंधूंनो! भारताच्या सर्व रोगांचे मूळ प्रामुख्याने त्याचे अज्ञान आहे! वर्षानुवर्षे त्यांची बुद्धी मुर्दाड व भ्रमिष्ट बनवण्यात आली आहे. धर्म-पंथ, जाती-वर्ण-संप्रदाय, रूढी-चमत्कार-देवावतार-स्वर्ग-पुण्यकर्म इत्यादी अनेक नावांनी भलभलत्याच गोष्टींचे किटण त्यांच्या बुद्धीवर चढवले गेले असून खऱ्या तात्त्विकतेपासून त्याला दूर ठेवण्यात आले आहे! उठणे, बसणे, बोलणे इत्यादी सामान्य व्यवहारांचे देखील यथार्थ स्वरूप बहुजन समाजास कळेनासे झाले, इतका त्याचा अधःपात झाला आहे! अशा अंधःकारमय परिस्थितीत प्रकाशाची ज्योत घराघरांतून पेटवण्याचे कार्य प्रत्येक विचारी माणसाने आज केले पाहिजे; तरच जनतेचे अंतरंग बदलेल व तिला स्वातंत्र्याचा खरा उपभोग घेता येईल. आपला कल्याणमार्ग व आपला कल्याणकर्ता कोण, हे जोवर जनतेला स्वतःच्या दृष्टीने पारखता येणार नाही, तोपर्यंत तिला कोणतेही स्वातंत्र्य व काहीही अधिकार दिले तरी दुर्दशेच्या चक्रव्यूहातून बाहेर पडणे शक्य नाही. अशा स्थितीत ब्रह्मज्ञानाच्या जाड गोष्टी लोकांना शिकवीत बसणे हा शुद्ध वेडेपणा असून, लोकांपासून जाणत्याने आपल्या बुद्धिमत्तेने स्वार्थ साधावा, यापेक्षा दुसरे पतन नाही!” बहुजनांनो, जागे व्हा! आपल्या कल्याणाचा मार्ग जीवनाच्या शिस्तीवर अवलंबून असतो. त्या शिस्तीला जीवन जगण्याचा मार्ग बनवा. व्यक्तिगत जीवन, कौटुंबिक जीवन याच्या आदर्शातून गाव आदर्श बनते आणि त्यातून राष्ट्र बलवान व स्वाभिमानी बनू शकते. पहा, करा चिंतन! ●●

जनक्रांतीच्या पाऊलवाटा



ज्ञानेश्वर दुर्गादास रक्षक
मो. 9823966282

## पुरोगामी महाराष्ट्र कोणाचा?

आरक्षणाचे उपवर्गीकरण विरोधात SC मधील मातंग सह ५९ जातीचा भव्य मोर्चा विरुद्ध प्रतिगामीच्या गुलामगिरीत असलेले पण आंबेडकरवाद समजून न घेणारे मातंगाचे काही नेते मोर्चे काढून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बौद्ध समाजावर आगपाकड करत आहेत. तरीही आम्ही मोठ्या भावाची भूमिका घेऊन म्हणतो की, हा मांग वाडा, हा बौद्ध वाडा, एक हा राजवाडा. इथल्या बहुजन समाजाला देशाच्या राजकारणात प्रतिनिधित्व मिळवून देण्यासाठी शाहू, फुले, आंबेडकर यांनी रक्ताचे पाणी केले आहे. संत परंपरेच्या शिवरायांच्या महाराष्ट्रात समाजप्रबोधन आणि समाज सुधारकांची न संपणारी क्रांतीची खाण आहे. तरीही शाहू, फुले. आंबेडकरांचा नुसता महाराष्ट्र नाही तर पुरोगामी महाराष्ट्र म्हटले जाते. कारण १८ व्या शतकात कार्ल मार्क्स ज्ञानाच्या डोंगरावर उभा राहून कामगार वर्गाला सत्ताधारी होण्याच्या हाका मारीत होता. तेव्हा महात्मा फुले भारताच्या अज्ञान, अंधश्रद्धा आणि गुलामगिरीच्या अंधःकारमय प्राचीन दरीत खितपत पडलेल्या शोषित, पिडीत, वंचित समाजाला ज्ञानाचा पहिला प्रकाश किरण दाखवीत होते. प्रतिगामी विचाराच्या गुलामांना पुरोगामित्व काय कळणार? पुरोगामित्व म्हणजे जुन्या, कालबाह्य आणि अन्यायकारक रूढी-परंपरांना विरोध करून सामाजिक, राजकीय आणि आर्थिक क्षेत्रात वैज्ञानिक दृष्टिकोनातून मानवी हक्कांचा पुरस्कार करून समता प्रस्थापित करणारा विचार म्हणजे पुरोगामित्व होय. म्हणून फुले, शाहू, आंबेडकर या केवळ व्यक्ती नसून क्रांतीचा परिवर्तनशील विचार आहे. शाहू, फुले, आंबेडकरांचा महाराष्ट्र हा उल्लेख हा प्रस्थापित व्यवस्थेची पोटदुखी आहे. एकदा शरद पवारांची मुलाखत घेत असताना मनसेचे नेते राज ठाकरे यांच्या पोटातील ओठावर आले. त्यांनी प्रश्न केला की, फुले, शाहू, आंबेडकर यांचा महाराष्ट्र पण शिवरायांचा महाराष्ट्र असे का म्हटले जात नाही? त्यावर शरद पवारांनी उत्तर दिले की, फुले, शाहू, आंबेडकर या तीन महापुरुषांनी महाराष्ट्राला पुरोगामी विचार, सामाजिक समता आणि सर्वसमावेशकतेची दिशा दिली. या त्रिमूर्तीचे समानतेच्या आणि परिवर्तन क्रांतीच्या पायाभरणीत त्यांचे मोठे योगदान राहिलेले आहे. फुलेंचे शिक्षण शाहूंचे आरक्षण आणि आंबेडकरांचे संविधानमुळेच महाराष्ट्राची जडणघडण एक पुरोगामी राज्य म्हणून झाली आहे. या महापुरुषांचे विचार हेच बहुजनांच्या विकासाचे मूळ आहे. ज्यांना या महान व्यक्तींची नावे घेण्याचा अभिमान वाटत नाही, त्यांना महाराष्ट्राचा मूळ इतिहास व संस्कृती समजलेली नाही. शरद पवार पुढे म्हणतात की, शिवछत्रपतींचा गौरव हा स्वतंत्रपणे केलाच जातो. मात्र फुले, शाहू आणि आंबेडकरांचे विचार हे सामाजिक न्यायाचा गाभा असल्याने त्यांचा उल्लेख करणे अत्यंत आवश्यक आहे. काही लोक भाषणा आधी फुले, शाहू, आंबेडकरांचे नाव घेण्याबद्दल आक्षेप घेत असले तरी हे महापुरुष महाराष्ट्राच्या जडणघडणाचे शिल्पकार असल्याने आपण नेहमीच त्यांचा नामोल्लेख करून त्यांच्या विचारांचा आदर्श पुढे नेण्याचा प्रयत्न करत आहे. शाहू, फुले, आंबेडकरांचा आणि आजच्या राजकारणातील कोणत्याही राजकारण्याचा एकमेकांशी नावापुरता देखिल वैचारिक अथवा कृतीत संबंध नाही हे वेगळ्याने सांगण्याची आता काही एक गरज नाही. पुरोगामी महाराष्ट्र फुले, शाहू, आंबेडकर यांचा आहे. तसाच तो महारांचा देखील आहे. कारण भारतीय समाजशास्त्रज्ञ, मानववंशशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ आणि लेखिका इरावती कर्वे यांनी स्वतः ब्राह्मण जातीच्या असूनही इतिहासाशी ईमान राखून महाराष्ट्र हा महारांचा असल्याचे मान्य केले आहे. महात्मा फुलेंनी ‘गुलामगिरी’ पुस्तकात महार नावाचा अर्थ उत्तम प्रकारे स्पष्ट केला आहे. जेव्हा पुष्यमित्र शुंग (परशुराम) यांनी भारतात राहणाऱ्या बौद्ध लोकांवर हल्ला केला तेव्हा बाकीचे सर्व पुष्यमित्र शुंग (परशुराम) समोर पराभूत झाले. परंतु काही बौद्ध लोक परशुरामाशी 21 वेळा लढले. ‘महा’ म्हणजे मोठा आणि ‘अरि’ म्हणजे शत्रू, महारी (महार) म्हणजे ब्राह्मणांचा सर्वात मोठा शत्रू आणि महारांचे मुख्य राज्य ‘महार-रत्था’ (आता - महार-राष्ट्र) होय. महात्मा फुले यांना वडील गोविंदरावांनी घरातून हाकलून दिले, तेव्हा ते म्हणाले, ‘बाबा, या देशाचा इतिहास बदलण्याची हिंमत कोणात असेल तर ती फक्त ‘महार’ समाजात आहे. कारण हाच समाज जागृत असून बाकी सगळे झोपलेले आहेत. म्हणून तुम्ही मला घराबाहेर काढले तरी मी या समाजाला शिकवेन.’ भारतातील ७ हजार जाती आणि २७ हजार पोट जातीचा अभ्यास करून त्यांना आरक्षण मिळण्यासाठी त्यांचे SC, ST, OBC मध्ये वर्गीकरण करण्यात आताच्या पुढाऱ्यांची हयात निघून जाईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आरक्षणाच्या नावाखाली ८५ टक्के बहुजन समाजाला एकसंघशक्तीने बांधलेली मूठ आहे. स्वतःच्या स्वार्थासाठी उपवर्गीकरणाच्या नावाखाली ५९ जातीने विस्कटून टाकले तर भावी पिढ्या आपणास कधीच माफ करणार नाहीत. यांचे भान ठेवून उपवर्गीकरणाला विरोध झाला पाहिजे. सम्राट अशोकाचा सोने की चिडिया ही भारताची ओळख निर्माण होण्यासाठी आंबेडकरवादाचा मुलमंत्र समता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि सामाजिक न्याय महत्वाचा आहे. महार, मातंग, चर्मकार आणि ढोर ही एका आईची चार लेकरे असून त्यांच्या कामावरून जाती निर्माण करण्यात आल्या. हे चारी भाऊ कधीच एकत्र येऊ नये यांची सनातनी व्यवस्थेने काळजी घेताना मातंगाला शकून तर महाराला अपशकून मानले. तरी या सर्वांना हीन वागणूक देऊन रोटीबेटी व्यवहार सोडा, शिवून देखील घेतले जात नव्हते. या चार भाच्यामध्ये यांनी ५९ जाती निर्माण केल्या. त्यांना एकसंघ होण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आरक्षणाच्या नावाखाली SC अनुसूचित जातीचा क्लास म्हणजे वर्ग तयार केला आहे. त्याला तोडून संघटित जाती विस्कळीत करण्यासाठी सनातनी मातंगाच्या खांद्यावर बंदूक ठेवून आरक्षणाचे उपवर्गीकरण आपला हेतू साध्य करून घेत आहेत. म्हणून उपवर्गीकरण करण्याचे मागणी करणाऱ्या काही मातंग नेत्यांनी पुरोगामी महाराष्ट्र कोणाचा हा इतिहास समजून घेऊन मगच टीका करावी. ●●






आनंद म्हस्के
मो. 8652325032

04 July 2026 page 03_Layout 1 7/3/2026 4:48 PM Page 1



# हिंदू देवस्थान संपत्ती बिल काळाची गरज

हिंदू धर्मियांचे श्रद्धास्थान व आदर्शांचे, संस्कृतीचे आणि जीवनमूल्यांचे प्रतिक म्हणून ज्यांना ओळखले जाते त्या 'मर्यादा पुरुषोत्तम' रामाच्या मंदिराला मिळालेल्या कोट्यवधी रुपयांच्या दानाची चोरी पुजारी व राममंदिर ट्रस्टच्या लोकांनी केल्याचे उघड झाल्यामुळे देशात एकच खळबळ माजली आहे. देवाच्या नावाने मंदिरात मिळालेल्या संपत्तीचा होत असलेल्या चोऱ्या व लुटीच्या पार्श्वभूमीवर डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी १९३१-३२ मध्ये मध्यप्रांत व वऱ्हाडच्या कायदेमंडळात मांडलेल्या हिंदू देवस्थान संपत्ती बिलाची आणि त्यांच्या द्रष्टेपणाची प्रकर्षाने आठवण येत आहे.

**डॉ. पंजाबराव देशमुखांचे कार्य :** महान शिक्षणतज्ज्ञ, द्रष्टे नेते, शेतकरी कष्टकरी वर्गाचे उद्धारक, थोर समाजसुधारक आणि स्वतंत्र भारताचे पहिले केंद्रीय कृषिमंत्री तथा संविधान सभेचे ज्येष्ठ सदस्य डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी कृषी, शिक्षण आणि सामाजिक न्यायाच्या क्षेत्रात अभूतपूर्व कार्य केले. अस्पृश्यता निवारणासाठी त्यांनी १९२७ मध्ये अमरावतीच्या अंबादेवी मंदिरात अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह केला होता. त्यांच्या या सत्याग्रहाला स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित होते. डॉ. भाऊसाहेब देशमुख स्वतः शेतकरी कुटुंबातील असल्यामुळे त्यांना शेतकऱ्यांच्या परिस्थितीची आणि तो दारिद्र्यामुळे सावकाराच्या पाशात अडकला असल्याची जाणीव होती. म्हणूनच त्यांनी शेतकऱ्यांना सावकारांच्या पाशातून मुक्त करण्यासाठी सावकारी नियंत्रण कायदा केला आणि सावकारांच्या कर्जाला पर्याय म्हणून ग्रामीण भागात स्वस्त आणि सुलभ कर्ज मिळण्यासाठी सहकारी चळवळीला मोठे बळ दिले. सामान्य आणि वंचित घटकांपर्यंत शिक्षण पोहोचावे या उदात्त हेतूने त्यांनी १९३२ मध्ये अमरावती येथे श्री शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापन केली. भारताचे कृषिमंत्री म्हणून त्यांनी शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली. कृषी शिक्षण व विकास आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी कृषी क्षेत्रात अनेक मूलभूत सुविधा उपलब्ध करून त्यांच्या सक्षमीकरणासाठी आयुष्यभर लढा दिला. म्हणूनच त्यांना शिक्षणमहर्षी, कृषीरत्न, कृषी क्रांतीचे प्रणेते म्हणून गौरविण्यात येते.

**हिंदू देवस्थान संपत्ती बिल :** भारतीय समाज खूप देवभोळा असून अंधश्रद्धेने ग्रस्त आहे, म्हणूनच तो देवाधर्माच्या नावावर वेगवेगळे कर्मकांड, पूजा विधी, होम हवन, तीर्थाटन करण्यासाठी आणि विशेषतः देवाच्या नावाने मंदिराला हजारो, कोट्यवधी रुपये दान देण्यासाठी फार मोठा खर्च करतो. लोकांच्या दानातून मंदिराला मिळालेली करोडो रुपयाची संपत्ती पुजाऱ्याच्या घरात जाते याची डॉ. पंजाबराव देशमुखांना जाणीव होती. म्हणून देशातील सर्व मंदिरे सरकारच्या नियंत्रणात असावी आणि देवळात जमा होणारा कोट्यवधी रुपयांचा उपयोग सरकारने शाळा, महाविद्यालये, वसतिगृहे, दवाखाने उभी करण्यासाठी आणि शेतकरी कष्टकरी वर्गाच्या उन्नतीसाठी उपयोगात आणावा या उदात्त हेतूने त्यांनी १९३१-३२ साली मध्यप्रांत आणि वऱ्हाडच्या कायदेमंडळात 'हिंदू देवस्थान संपत्ती बिल' मांडले होते.



**हिंदू देवस्थान बिलाची उद्दिष्ट्ये : १) सरकारी नियंत्रण :** देशातील मंदिरांची आणि देवस्थानांची प्रचंड संपत्ती गैरवापरापासून वाचवण्यासाठी सरकारने ती आपल्या ताब्यात घ्यावी, असा या बिलाचा मुख्य उद्देश होता.

२) **शैक्षणिक वापर :** देवस्थानांच्या या अफाट संपत्तीतून व उत्पन्नातून मंदिरांची योग्य व्यवस्था लावून, उरलेला सर्व निधी गोरगरीब जनतेला मोफत शिक्षण देण्यासाठी आणि शैक्षणिक कार्यासाठी वापरला जावा, असा क्रांतिकारी विचार त्यांनी मांडला होता.

३) **दुर्गामी उद्देश :** कोणत्याही प्रकारचा नवा कर न लावता देवस्थानांच्या पैशातून राज्यातील सर्वसामान्य मुलांना दर्जेदार शिक्षण मिळू शकते, हे त्यांनी आकडेवारीसह पटवून दिले होते. तथापि, त्या काळातील विरोधकांनी भोळ्याभाबड्या जनतेला या बिलाविरोधात भडकवले. परिणामी, पुरोगामी विचारांचे हे विधेयक नामंजूर झाले होते.

**मंदिरातील संपत्तीचे गौडबंगाल :** अयोध्येतील राम मंदिरातील दानाच्या कोट्यवधी रुपयांच्या चोरीचे घबाड उघड झाले. पण देशातील हजारो मंदिरातील संपत्तीचे गौडबंगाल कायम आहे. राम मंदिरातील संपत्तीची चोरी मंदिराची देखभाल व व्यवस्थापन करण्यासाठी स्थापन केलेल्या श्री राम जन्मभूमी तीर्थ ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनीच केली. म्हणून काही सन्माननीय अपवाद वगळता देशातील अनेक मोठमोठ्या देवस्थानाला मिळालेल्या पैशाच्या देखील अशाच चोऱ्या होत असतील अशी शंका घेण्यास फार मोठा वाव आहे. कारण पुजारी व देवस्थानाचे ट्रस्टी म्हणून कार्य करणाऱ्या लोकांना हिंदू धर्मियांचा सर्वश्रेष्ठ परमेश्वर असलेल्या रामाचीच भीती नाही तर इतर देवांचे काय? आपल्या देशात वेगवेगळ्या देवांची असंख्य मंदिरे आहेत. या मंदिरात भक्तीभावाने आणि श्रद्धेने लोक दररोज दान देतात. हा दान म्हणून मिळालेला पैसा कुठे जातो याचा काहीही हिशेब नाही, त्याबाबत कोणतेही कायदेशीर निर्बंध नाहीत. म्हणजेच देशातील करोडो लोकांनी श्रद्धेने केलेल्या दानाचा आणि त्यांच्या श्रद्धेचा निव्वळ बाजार सुरू असून पुजारी म्हणून कार्य करणारे आणि त्यांना पाठीशी घालणारे राजकारणी या पैशाचा अपहार करून स्वतःसाठी वापर करतात. त्यांना देवाशी, त्याच्या श्रद्धेशी किंवा लोकांच्या भावनेशी काहीही देणेघेणे नाही. कारण त्यांचा देव मंदिरात किंवा दगडाच्या मूर्तीत नसतो तर देवाच्या नावावर मंदिराला मिळणाऱ्या संपत्तीत असतो.



प्रा. डॉ. एम. आर. इंगळे
मो. 9423429060

**संत गाडगे बाबांचे बोल :** कर्मयोगी संत गाडगेबाबा नेहमी आपल्या कीर्तनातून लोकांना सांगत असत की, ‘देवळात देव नसतो तर पुजाऱ्याचे पोट.’ म्हणून देवाधर्माच्या नावावर दान देऊ नका, तीर्थयात्रेला जाऊन पैशाची धूळधाणी करू नका. तो पैसा आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी आणि गरिब गरजू लोकांना मदत करण्यासाठी वापरा. तीच खरी ईश्वरभक्ती असून त्यातच तुमचे हित आहे. पण समाज देवाधर्माच्या आणि अंधश्रद्धेच्या अंधार कोठडीत अडकला असल्यामुळे तो सुधारला नाही, डोळस झाला नाही.

**डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेबांचा द्रष्टेपणा :** डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांना संत गाडगेबाबांचा सहवास लाभला होता. गाडगे बाबा आपल्या कीर्तनातून लोकांना देत असलेल्या संदेशाची व करत असलेल्या उपदेशाची महती त्यांना कळली होती. म्हणूनच त्यांनी लोकांच्या श्रद्धेतून मंदिरात येणारा पैसा समाजाच्या उत्थानासाठी व देशाच्या विकासासाठी वापरला गेला पाहिजे. या उद्देशाने स्वातंत्र्यपूर्व काळातच म्हणजे १९३१-३२ साली मध्यप्रांत व वऱ्हाडच्या कायदेमंडळात हिंदू देवस्थान संपत्ती बिल मांडले होते. यावरून त्यांच्याठायी असलेल्या द्रष्टेपणाची साक्ष पटते. जर त्यांचे विधेयक त्यावेळी संमत झाले असते तर आज देशातील मंदिराच्या पैशाचा गैरव्यवहार किंवा लूट झाली नसती. तो पैसा शिक्षणासाठी, आरोग्यसेवेसाठी, शेती, शेतकरी व कष्टकरी वर्गाच्या उन्नतीसाठी, मोठमोठे उद्योगधंदे उभारण्यासाठी वापरला गेला असता आणि देश प्रगतीच्या शिखरावर पोहचला असता. मग कोणत्याच वर्गासाठी फुकट पैसे वाटण्याच्या योजना सुरू करण्याची गरज राहिली नसती आणि भारत आर्थिकदृष्ट्या सक्षम, बलशाली व सुजलाम सुफलाम राष्ट्र म्हणून जगाचा आदर्श ठरले असते. पण आजच्या आधुनिक, विज्ञान व तंत्रज्ञानाच्या युगातही भारतीयांमध्ये विवेक व चिकित्सक बुद्धीचा अभाव आहे, म्हणूनच देवासोबतच देशाच्या संपत्तीची लूट होत आहे. पण जनता मूग गिळून गप्प आहे, हीच देशाची फार मोठी शोकांतिका आहे.●●

## मित्रपारखी

### अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

माणसाच्या आयुष्यात मैत्रीला अनन्यसाधारण महत्व आहे. मैत्रीचे नाते जर घट्ट असेल तर कुणी आपल्या मुळावर जरी घाव घातला तरी खरा मित्र आपल्याला त्याही परिस्थितीत कोसळू देत नाही. मित्र हा हिरा पारखणाऱ्या रत्नपारख्यापेक्षा श्रेष्ठ असतो. कारण तो आपली पीडा, तसेच सुखदुःख सर्व काही आपण सांगितले नाही तरी पारखतो. कारण त्याला मौनाची भाषा देखील समजते. मैत्रीचा मजबुत धागा म्हणजे विश्वास. कुणाशीही मैत्री टिकवायची असेल तर ही बाब खूप महत्वाची आहे. म्हणून विचारपूर्वकच विश्वास करावा. समोरची व्यक्ती विश्वास ठेवण्याच्या योग्यतेची आहे किंवा नाही हे बघावे. तसे बघीतले तर काही क्षणांची साथसंगत तर तिरडीला खांदा देणारे सुद्धा करतात. कायम स्वरूपी दिर्घकाळ साथ देणारे क्वचितच असतात. असे म्हणतात मित्रासाठी जिव देणे काहीही कठीण नाही. पण जिव देणारा मित्र लाभणे ही गोष्ट मोठी कठीण आहे. मैत्रीत मी पणाचा त्याग, स्नेहाची झुळूक असावी लागते. परस्परांच्या संवादातला गोडवा हा संबंधात काही कारणांमुळे आलेला कडवटपणा नाहीसा करतो. मित्र हा त्या दिव्यासारखा असतो. तो जेथे प्रज्वलित झाला तो सर्व परिसर प्रकाशमान करतो. मग ती झोपडी असो की राजवाडा. खरा मित्र त्या दिव्याप्रमाणेच गरीब, श्रीमंत असा भेद करीत नाही. सुस्वभाव हे ते अत्तर आहे जे मैत्रीला सुगंधित करते. सन्मान ते दान आहे जे नात्यांची विण घट्ट करते आणि कर्तव्य ती प्रार्थना आहे जी भाग्य सुद्धा बदलते. मैत्रीत दुसऱ्यापासून अपेक्षा कमी आणि स्वतःवर विश्वास जास्त असावा लागतो. मैत्रीला मौल्यवान करण्यासाठी नाते उथळ असुन चालत नाही. त्यासाठी नात्याची खोली खूप आवश्यक असते. कारण अनमोल मोती हे सहजासहजी तसेच किनाऱ्यावर मिळत नसतात. या दुनियेत तीच व्यक्ती सुंदर आहे जी आपल्या काळजात घर करते. आपल्या मित्रांशी असलेल्या मैत्रीचे वर्णन करतांना एक मित्र म्हणाला, “हम इस तमीज के साथ उनके पास बैठते है, कि जैसे शाह की क़दमों में दास बैठते है, बस एक वो लोग है, जिन्हे दोस्त कहता हूँ मैं, वरना साथ में तो ऐसे पचास बैठते हैं, मैं इसलिए भी उस वक़्त खुलकर हंस नहीं पाता, जब उदास दोस्त मेरे आसपास बैठते है.” ●●

बहुजन सौरभ

# रान्यावरील लंब्या रोट्या
## परंपरा, स्वाभिमान आणि रोजगाराचा नवा मार्ग

आजच्या आधुनिक लग्न समारंभांमध्ये झगमगाट, डीजे, पिझ्झा-पास्ता, लाईव्ह काउंटर आणि विदेशी खाद्यपदार्थांची रेलचेल मोठ्या प्रमाणात दिसून येते. मात्र या दिखाव्याच्या संस्कृतीत आपल्या समाजाच्या अस्सल परंपरा, लोककला आणि खाद्यसंस्कृती हळूहळू हरवत चालल्या आहेत. विशेषतः महार-बौद्ध समाजातील ‘रान्या’वरील लंब्या रोट्या ही एकेकाळची अभिमानास्पद परंपरा आज नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. ही केवळ पाककला नव्हती, तर ती स्त्रियांच्या कौशल्याची, श्रमसंस्कृतीची आणि सामाजिक प्रतिष्ठेची जिवंत ओळख होती. पूर्वी महार समाजात मुलगी पाहताना “तिला मांडे करता येतात का?” हा प्रश्न महत्त्वाचा मानला जायचा. कारण ‘मांडे’ म्हणजे साधी पोळी नव्हे, तर अत्यंत पातळ, लंबी आणि कौशल्यपूर्ण रोटी. ती मातीच्या उलट्या घड्यावर भाजली जायची, ज्याला ‘रान्या’ म्हणत. या रोट्या बनवणे ही कला होती. त्यासाठी संयम, सराव आणि अनुभव लागत असे. ही परंपरा आजीकडून आईकडे आणि आईकडून मुलीकडे जात होती. त्या रोट्यांमध्ये फक्त पीठ नव्हते, तर संघर्षमय इतिहास, संस्कृती आणि आत्मसन्मान मिसळलेला होता. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागपूर दौऱ्यावर आले असताना बिडी पेठेतील महिलांनी स्वतःच्या हाताने तयार केलेल्या लंब्या रोट्या आणि मटण त्यांना वाढले होते. डॉ. बाबासाहेबांनी त्या रोट्यांची चव तर घेतलीच, पण त्या बनवण्याची संपूर्ण प्रक्रिया मोठ्या कुतूहलाने पाहिली. त्यावेळी त्यांनी हसत म्हटले होते, “तुम्ही रोट्या इतक्या पातळ केल्या आहेत की त्यातून तुमचा चेहरा दिसतो!” हा प्रसंग केवळ विनोद नव्हता; तो त्या स्त्रियांच्या कौशल्याचा आणि लोककलेचा सन्मान होता.



प्रमोद जांभूळकर
मो.9823969097

डॉ. बाबासाहेबांना आपल्या समाजाच्या सांस्कृतिक वारशाबद्दल किती आदर होता, याची ही जिवंत साक्ष आहे. आज मात्र परिस्थिती बदलली आहे. आधुनिकतेच्या नावाखाली ‘रान्या’ घरातून गायब झाली आणि तिच्यासोबत आपल्या संस्कृतीचा एक महत्त्वाचा भागही हरवू लागला. आपण परदेशी खाद्यसंस्कृती सहज स्वीकारली; पण आपल्या आजी-पणजींच्या हातची कला जपण्यात मागे पडलो. मात्र या परंपरेत केवळ संस्कृतीच नाही, तर रोजगार आणि उद्योगाचीही मोठी क्षमता दडलेली आहे. जर ‘रान्या’वरील लंब्या रोट्यांना पुन्हा लग्न समारंभ, सांस्कृतिक मेळावे, फूड फेस्टिव्हल आणि पर्यटनाशी जोडले गेले, तर अनेक महिलांसाठी घरबसल्या रोजगार निर्माण होऊ शकतो. आज जसे महाराष्ट्रीयन पदार्थांचे स्टॉल, खानावळी आणि घरगुती व्यवसाय लोकप्रिय होत आहेत, तसेच ‘रान्या रोटी’ हेही एक ब्रँड बनू शकते. महिलांचे बचत गट, स्वयंरोजगार संस्था आणि युवा उद्योजक या परंपरेला आधुनिक स्वरूप देऊ शकतात. “डॉ. बाबासाहेबांना आवडलेल्या रोट्या” या नावाने या कलेला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरही ओळख मिळू शकते. लग्न समारंभात ‘रान्या रोटी’चा विशेष स्टॉल असावा, हळदीच्या कार्यक्रमात ज्येष्ठ महिलांकडून लाईव्ह प्रात्यक्षिक दाखवले जावे, तरुण पिढीला वर्कशॉपद्वारे ही कला शिकवली जावी आणि सोशल मीडियावर तिचे व्हिडिओ प्रसारित केले जावेत. कारण ही रोटी केवळ खाद्यपदार्थ नाही, ती इतिहास, ओळख, स्वाभिमान आणि आत्मनिर्भरतेची संस्कृती आहे. बिर्याणी आणि नान जगभर मिळतील; पण ‘रान्या’वरील पातळ लंबी रोटी ही आपल्या समाजाची वेगळी ओळख आहे. ती जर आपणच जपली नाही, तर उद्या ती संग्रहालयात “हरवलेली लोककला” म्हणून उरेल. ज्या रोटीतून डॉ. बाबासाहेबांनी चेहरा पाहिला, त्या रोटीतून आपल्या पुढच्या पिढीने स्वतःचा इतिहास, संघर्ष आणि स्वाभिमान पाहिला पाहिजे. परंपरा टिकवण्यासाठी मोठ्या आंदोलनांची गरज नसते; सुरुवात आपल्या घरच्या लग्नापासूनही होऊ शकते. मग सांगा तुमच्या घरच्या पुढच्या लग्नात ‘रान्या’वरील लंब्या रोट्या असणार का?●●

# शिलाची परीक्षा

एका काळी बोधिसत्व वाराणसीत एका प्रसिद्ध आचार्यापाशी शास्त्राध्यन करीत असे. त्या आचार्याची एकुलती एक मुलगी वयात आली होती. तिला आपल्या शिष्यांपैकी एकाला द्यावी असा आचार्याचा बेत होता. पण तो अमलात आणण्यापूर्वीच आपल्या शिष्याचे शील कसोटीस लावून पहावे आणि त्यात जो उत्तम ठरेल त्यालाच मुलगी द्यावी. असा विचार करून एके दिवशी तो आपल्या शिष्यांना म्हणाला, मुलांनो मी माझ्या एकुलत्या एक मुलीचे लग्न करू इच्छित आहे. या मंगल समयी तुम्ही मला मदत केली पाहिजे ती अशी की, प्रत्येकाने आपआपल्या घरातून एकेक वस्तू चोरून आणावी आणि ती माझ्या स्वाधीन करावी. परंतू तुम्ही चोरी करतांना जर कोणी पाहीले तर त्या वस्तूचा मी स्वीकार करणार नाही. तेव्हा कोणीही प्राणी पहाणार नाही अशा ठिकाणीच चोरी करून लग्नाच्या उपयोगी पडणारे सामान घेऊन या. सगळ्या शिष्यानी आपपल्या घरातून कोणाला न कळत कोणी दागिना, तर कोणी कपडा, तर कोणी पैसे अशा निरनिराळ्या वस्तू सवडीप्रमाणे चोरून आणून गुरूच्या हवाली केल्या. गुरूजी वस्तू ज्या शिष्याने आणली त्या वस्तूवर त्यांच्या नावाची चिठ्ठी बांधून ती आपल्या कोठीत निराळी ठेवून दिली. सर्वांनी यथाशक्ती पदार्थ आणले. पण तथागताने कोणतीच वस्तू आणली नाही. तेव्हा आचार्य म्हणाले, माझ्या सर्व शिष्यांनी यथाशक्ती कोणता ना कोणता पदार्थ आणला आहे. पण तू मात्र काही एक आणले नाहीस. किंबहुना आणण्याचा प्रयत्न देखिल केला नाहीस. मला वाटते तू या सर्व शिष्यात अत्यंत आळशी आहेस. तथागत म्हणाले गुरुजी आपली आज्ञा न पाळण्याच्या हेतूने किंवा आळसाने मी काही प्रयत्न केला नाही असे नव्हे. पण आपल्या हुकूमाप्रमाणे वागणे केवळ अशक्य आहे म्हणून मी खटपट केली नाही. आचार्याने असे का? असा प्रश्न केल्यावर तथागत म्हणाले, गुरुमहाराज ज्या ठिकाणी पहाणार नाही अशाच जागी चोरी करून आणा अशी आपली आज्ञा आहे. पण अशी जागा भूमंडळावर कशी सापडेल? अरण्यात वनदेवता आपले कृत्य पहात असतात. अशा ठिकाणी एकांत आहे अशी मूर्ख माणसाचीच काय ती समजूत असते आणि जेथे वनदेवता नाहीत अशा स्थळी आपला अंतरात्माच आपले कृत्य पहात असतो. अर्थात एकांत स्थळ सापडणार कसे जेथे इतर प्राणी नसतात. त्या स्थळी आपण स्वतः असल्यामुळे त्याला एकांत स्थळ म्हणता येत नाही. हे तथागताचे भाषण ऐकून आचार्य त्यावर फार प्रसन्न झाले आणि म्हणाले, बा मुला, तुम्हा सर्वांचे शील कसोटीला लावण्यासाठी मी ही युक्ती योजिली होती. माझ्या शिक्षणाचे खरे रहस्य तुलाच समजले असे म्हटले पाहिजे. इतर विद्यार्थ्यांना ते समजले असते. ती त्यांनी माझ्या बोलण्याचा विचार न करता चोरून वस्तू आणल्या नसत्या. याप्रमाणे तथागताची तारीफ आचार्याने आपल्या मुलीशी त्याचा विवाह लावून दिला आणि इतर शिष्यांनी आणलेल्या वस्तू ज्याच्या त्यास परत करून ते म्हणाले, मुलांनो आपल्या गुरूने किंवा वडीलांनी जरी काही सांगीतले तरी त्याचा नीट विचार केल्याशिवाय आपण कार्याला प्रवृत्त होता कामा नये. दुसऱ्याच्या विचारानेच चालणारा मनुष्य फसल्याशिवाय रहात नाही. म्हणून तुमच्याच बुद्धीने तुमच्या शीलाचे रक्षण करा.●●



शारदा पाटील मोटघरे
मो.8010763645

# लोकप्रतिनिधींचे पक्षांतर म्हणजे लोकशाहीची थट्टा आणि मतदारांचा विश्वासघात

भारतीय स्वातंत्र्यासाठी असंख्य देशभक्तांनी त्याग, समर्पण आणि बलिदान दिले. त्यांच्या संघर्षामुळे भारत परकीय सत्तेतून मुक्त झाला आणि भारतीय संविधानाच्या आधारे संसदीय लोकशाहीची स्थापना झाली. लोकशाहीची व्याख्या विविध विचारवंतांनी वेगवेगळ्या शब्दांत केली आहे. वॉल्टर बेजहॉट यांनी ‘चर्चा करून राज्यकारभार चालविणे’ अशी लोकशाहीची व्याख्या केली, तर अब्राहम लिंकन यांनी ‘लोकांचे, लोकांसाठी, लोकांनी चालविलेले सरकार’ असे लोकशाहीचे स्वरूप स्पष्ट केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, ‘लोकांच्या राजकीय आणि सामाजिक जीवनात रक्ताचा एकही थेंब न सांडता क्रांतिकारक बदल घडवून आणणे म्हणजे लोकशाही होय.’ सामाजिक आणि आर्थिक समता प्रस्थापित करणारी शासनव्यवस्था हीच लोकशाहीची खरी कसोटी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. स्वातंत्र्यानंतर देशात लोकप्रतिनिधींमार्फत शासन चालविण्याची संसदीय पद्धती स्वीकारण्यात आली. लोकसभा आणि विधानसभेतील सदस्य हे जनतेने निवडून दिलेले प्रतिनिधी असून, आपल्या मतदारसंघाचा विकास करणे ही त्यांची मूलभूत जबाबदारी आहे. मात्र, आजच्या राजकारणाकडे पाहिले असता लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांपासून मोठ्या प्रमाणात विचलन झाल्याचे दिसून येते. स्वातंत्र्यलढ्यातील नेत्यांनी निःस्वार्थ भावनेने उभारलेली लोकशाही पुढील काळात अनेक राजकीय स्वार्थांमुळे कमकुवत होत गेली. महाराष्ट्राला शिव, फुले, शाहू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांची परंपरा लाभली आहे. सामाजिक परिवर्तन, सहकार आणि विकासाच्या अनेक चळवळींची सुरुवात या राज्यातून झाली. त्यामुळे महाराष्ट्राला देशाची कार्यशाळा म्हटले जात असे. परंतु आज राज्य आर्थिक, सामाजिक आणि राजकीय अस्थिरतेचा सामना करत आहे. यामागे मोठ्या प्रमाणावर स्वार्थी राजकारण आणि सत्तेसाठी होणारी स्पर्धा कारणीभूत असल्याचे दिसते. आज राजकारण अनेकांसाठी जनसेवेऐवजी व्यवसाय बनल्याचे चित्र आहे. लाखो उच्चशिक्षित युवक रोजगाराच्या प्रतिक्षेत असताना लोकप्रतिनिधी होण्यासाठी कोणतीही शैक्षणिक अट, परीक्षा किंवा मुलाखत आवश्यक नसते. दुसरीकडे सरकारी नोकरीसाठी स्पर्धा परीक्षा, शारीरिक चाचण्या, वैद्यकीय तपासणी आणि चारित्र्य पडताळणी यांसारख्या अनेक प्रक्रिया पूर्ण कराव्या लागतात. त्यातही अनेक कर्मचाऱ्यांची जुनी पेन्शन योजना बंद करण्यात आली, तर लोकप्रतिनिधींना विविध भत्ते, सुविधा आणि पेन्शनची व्यवस्था कायम आहे. त्यामुळे सामान्य नागरिकांमध्ये असंतोष निर्माण होणे स्वाभाविक आहे. निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर पैसा, प्रभाव, जातीय समीकरणे आणि विविध राजकीय डावपेच वापरले जातात. त्यामुळे निवडून आलेल्या अनेक लोकप्रतिनिधींकडून आदर्श लोकसेवेची अपेक्षा ठेवणे कठीण बनते. मात्र, यापेक्षाही गंभीर समस्या म्हणजे लोकप्रतिनिधींचे वाढते पक्षांतर. लोकशाहीत सत्ताधारी पक्षाइतकाच मजबूत विरोधी पक्ष असणे आवश्यक असते. विरोधी पक्ष शासनाच्या कामकाजावर नियंत्रण ठेवतो, चुका दाखवून देतो आणि पर्यायी भूमिका मांडतो. परंतु अलीकडच्या काळात विरोधी पक्षातील आमदार आणि खासदारांना आपल्या पक्षात आणण्याची स्पर्धा वाढली आहे. महाराष्ट्रात शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि इतर पक्षांतील मोठ्या प्रमाणावर झालेले पक्षांतर हे याचे ठळक उदाहरण आहे. परिणामी विरोधी पक्षाची ताकद कमी झाली आणि लोकशाहीतील सत्तासंतुलन बिघडले. मतदार एखाद्या व्यक्तीला केवळ वैयक्तिक लोकप्रियतेमुळे नव्हे, तर तो ज्या पक्षाच्या विचारसरणीचे प्रतिनिधित्व करतो त्या पक्षाच्या चिन्हावर मतदान करतात. त्यामुळे निवडून आल्यानंतर वैयक्तिक लाभ, सत्तेची लालसा किंवा राजकीय सोयीसाठी पक्षांतर करणे म्हणजे मतदारांच्या विश्वासाचा आणि लोकशाही मूल्यांचा विश्वासघात होय. अशा कृतीमुळे मतदारांच्या जनादेशाचा अपमान होतो आणि लोकशाहीची विश्वासार्हता कमी होते. पक्षांतर रोखण्यासाठी १९८५ मध्ये बावन्नाव्या घटनादुरुस्तीद्वारे भारतीय संविधानाच्या दहाव्या अनुसूचीमध्ये पक्षांतरबंदी कायदा करण्यात आला. तरीही त्यातील उणिवांमुळे मोठ्या प्रमाणावर पक्षांतर सुरूच आहे. त्यामुळे या कायद्यात अधिक कठोर सुधारणा करण्याची गरज आहे. पक्षांतर करणाऱ्या खासदार किंवा आमदाराचे सदस्यत्व तात्काळ रद्द करण्यात यावे आणि त्याला ठराविक कालावधीसाठी निवडणूक लढविण्यास बंदी घालावी. अशा कठोर तरतुदींमुळे वैयक्तिक स्वार्थासाठी होणारे पक्षांतर मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. एखाद्या लोकप्रतिनिधीने राजीनामा दिल्यास त्या मतदारसंघात तात्काळ पोटनिवडणूक घेण्याऐवजी पुढील सार्वत्रिक निवडणुकीपर्यंत जागा रिक्त ठेवण्याचा पर्यायही विचारात घ्यावा. वारंवार होणाऱ्या पोटनिवडणुकांमुळे मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक निधी खर्च होतो. त्याचप्रमाणे एका व्यक्तीला दोन मतदारसंघांतून निवडणूक लढविण्याची परवानगी देऊ नये. अशा प्रकारामुळे एका मतदारसंघात पुन्हा निवडणूक घ्यावी लागते आणि शासनावर अनावश्यक आर्थिक भार पडतो. राजकीय पक्षांनी उमेदवारी देताना निष्ठावान, प्रामाणिक, चारित्र्यसंपन्न आणि जनसेवेसाठी कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांनाच संधी द्यावी. सत्तेच्या मोहापोटी वारंवार पक्ष बदलणाऱ्या ‘आयाराम-गयाराम’ प्रवृत्तीवर कठोर कायदेशीर निर्बंध आणणे ही काळाची गरज आहे. लोकशाहीचे खरे बळ मतदारांचा विश्वास आणि जनादेशाचा सन्मान यामध्ये आहे. त्यामुळे लोकप्रतिनिधींनी पक्षनिष्ठा, नैतिकता आणि लोकांप्रती असलेली जबाबदारी जपली पाहिजे. कठोर पक्षांतरबंदी कायदा, जनादेशाचा आदर आणि स्वच्छ राजकीय संस्कृती यांमुळेच लोकशाही अधिक सक्षम होईल. त्यातून प्रामाणिक, कर्तव्यदक्ष, पक्षनिष्ठ आणि जनहिताला प्राधान्य देणाऱ्या लोकप्रतिनिधींना संधी मिळेल, तर स्वार्थी, संधीसाधू आणि सत्तेसाठी तत्त्वांशी तडजोड करणाऱ्या राजकारण्यांना जनतेकडून योग्य उत्तर मिळेल. खऱ्या अर्थाने लोकशाही बळकट करण्याचा हाच प्रभावी मार्ग आहे.●●





रतन तायडे
94201 25761

# सरकारच्या चुकीच्या धोरणाला 'कॉकरोच' डंख मारणार का?

देश विकासाच्या मार्गावर असल्याचा दावा केला जात असला, तरी बेरोजगारी, महागाई, कुपोषण, शेतकरी आत्महत्या, शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार आणि रोजगाराच्या मर्यादित संधी या गंभीर समस्या आजही कायम आहेत. वाढत्या भ्रष्टाचारामुळे व्यवस्था पोखरली जात असून त्याचा सर्वाधिक फटका बेरोजगार तरुणांना बसत आहे. अशा परिस्थितीत सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी एका सुनावणीदरम्यान काही बेरोजगार तरुणांची तुलना ‘झुरळ’ (कॉकरोच) यांच्याशी केल्याच्या वक्तव्यामुळे देशभरात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. देशातील युवक आधीच वाढत्या बेरोजगारीमुळे आणि महागाईमुळे त्रस्त आहेत. त्यातच विविध भरती प्रक्रियांमधील विलंब, पेपरफुटी, शिक्षणातील गैरव्यवहार आणि रोजगाराच्या संधींचा अभाव यामुळे त्यांच्या मनात असंतोष वाढत आहे. अशावेळी उच्च संवैधानिक पदावरील व्यक्तीकडून झालेल्या या वक्तव्याने अनेक तरुणांच्या भावना दुखावल्या. १५ मे २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयात एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी, ‘काही बेरोजगार तरुण झुरळांसारखे असतात, जे नंतर मीडिया, सोशल मीडिया किंवा आरटीआय कार्यकर्ते बनून व्यवस्थेवर हल्ला करू लागतात,’ असे वक्तव्य केले होते. या विधानानंतर देशभरात तसेच परदेशातही सोशल मीडियावर मोठी चर्चा रंगली. त्यानंतर त्यांनी स्पष्टीकरण देत सांगितले की, त्यांचा उद्देश सर्व बेरोजगार तरुणांविषयी नव्हता, तर बनावट पदव्या घेऊन समाजमाध्यमांवरून विनाकारण व्यवस्थेला लक्ष्य करणाऱ्या काही व्यक्तींविषयी होता. हे स्पष्टीकरण मान्य केले तरी ‘कॉकरोच’ हा शब्द अनेक बेरोजगारांच्या मनाला खोलवर लागला. आज देशातील अनेक युवक वर्षानुवर्षे स्पर्धा परीक्षांची तयारी करतात. पेपरफुटी, भरती प्रक्रियेतील विलंब आणि भ्रष्टाचारामुळे त्यांच्या आयुष्याची महत्त्वाची वर्षे वाया जात आहेत. अलीकडील पेपरफुटीच्या घटनांमुळे हजारो उमेदवारांचे नुकसान झाले असून काही तरुणांनी नैराश्यातून आत्महत्याही केल्याच्या घटना समोर आल्या. त्यामुळे शिक्षण आणि रोजगार व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत झाला आहे. सरकारकडून मोठ्या उद्योगांची, गुंतवणुकीची आणि विकास प्रकल्पांची घोषणा केली जाते. मात्र, प्रत्येक जिल्ह्यात स्थानिक स्तरावर पुरेशा रोजगाराच्या संधी निर्माण झालेल्या दिसत नाहीत. त्यामुळे लाखो युवकांना आपल्या कुटुंबापासून दूर जाऊन मुंबई, पुणे, बेंगळुरू, हैदराबाद, अहमदाबाद यांसारख्या शहरांत रोजगारासाठी स्थलांतर करावे लागते. तेथेही सर्वांना रोजगार मिळतोच असे नाही. बेरोजगारी, असुरक्षितता आणि नैराश्यामुळे अनेक तरुण मानसिक तणावाखाली जीवन जगत आहेत. या पार्श्वभूमीवर ‘कॉकरोच’ या शब्दामुळे युवकांमध्ये एक वेगळी मानसिकता तयार झाली आहे. अनेकांनी हा शब्द अपमान म्हणून न घेता अन्यायाविरुद्ध लढण्याचे प्रतिक म्हणून स्वीकारण्यास सुरुवात केली आहे. सोशल मीडियावर ‘कॉकरोच जनता पार्टी’सारख्या ऑनलाइन मोहिमांना मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येते. यावरून युवकांमधील असंतोष किती तीव्र आहे, याची कल्पना येते. आज बेरोजगार तरुणांच्या मनात राजकीय व्यवस्थेबद्दल नाराजी वाढत आहे. लोकप्रतिनिधींना वेतन, भत्ते, पेन्शन, शासकीय सुविधा आणि इतर लाभ मिळतात, तर दुसरीकडे लाखो युवक नोकरीच्या प्रतिक्षेत आहेत. अनेक लोकप्रतिनिधी अल्पावधीत मोठी संपत्ती निर्माण करतात, तर सामान्य युवक रोजगारासाठी संघर्ष करताना दिसतो. त्यामुळे राजकारण जनसेवेपेक्षा सत्तेचे आणि वैयक्तिक फायद्याचे साधन बनत असल्याची भावना समाजात वाढत आहे. शिक्षण क्षेत्रातही व्यापारीकरण वाढल्याची टीका सातत्याने होत आहे. अनेक राजकीय नेत्यांच्या शैक्षणिक संस्था आहेत, तर सामान्य विद्यार्थ्यांना महागड्या शिक्षणाचा आणि गुणवत्तेच्या प्रश्नांचा सामना करावा लागतो. यामुळे शिक्षण आणि रोजगार या दोन्ही क्षेत्रांबद्दल युवकांमध्ये असंतोष निर्माण होत आहे. पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या किंमतीही सामान्य नागरिकांच्या अडचणी वाढवत आहेत. सरकारकडून आंतरराष्ट्रीय परिस्थिती, आयात-निर्यात आणि आर्थिक कारणांचा उल्लेख केला जातो; मात्र निवडणुकांच्या काळात इंधनदर स्थिर राहतात आणि त्यानंतर वाढ होऊ लागते, अशी भावना अनेक नागरिक व्यक्त करतात. त्यामुळे सरकारच्या आर्थिक धोरणांबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. आज बेरोजगार तरुण, शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्य नागरिक यांच्यातील असंतोष वाढताना दिसत आहे. रोजगार, शिक्षण, महागाई आणि भ्रष्टाचार या प्रश्नांवर सरकारने ठोस उपाययोजना करणे ही काळाची गरज आहे. अन्यथा युवकांचा आक्रोश अधिक तीव्र होऊ शकतो. भारतात सार्वजनिक जीवनात अनेकदा प्रथम वादग्रस्त वक्तव्य केले जाते आणि नंतर त्याचे स्पष्टीकरण किंवा माफी दिली जाते. मात्र, अशा विधानांचा समाजावर, विशेषतः तरुणांच्या मानसिकतेवर दूरगामी परिणाम होत असतो. त्यामुळे जबाबदार पदांवरील व्यक्तींनी शब्दांचा वापर अत्यंत संयमाने करणे आवश्यक आहे. माझ्या मते, ‘कॉकरोच’ या शब्दाने देशातील बेरोजगार युवकांच्या मनातील वेदना आणि असंतोष अधिक ठळकपणे समोर आणला आहे. हा प्रसंग युवकांसाठी एक जागृतीचा टप्पा ठरू शकतो. त्यांनी लोकशाही मार्गाने आपल्या प्रश्नांसाठी संघटितपणे आवाज उठविला, तर रोजगार, शिक्षण आणि पारदर्शक शासनव्यवस्थेसाठी सकारात्मक बदल घडू शकतात.●●



रमेश लांजेवार
मो.- 9921690779



## स्वाभिमानाचे स्मरणशिल्प - १९३

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा नांदेड



नांदेड रेल्वे स्टेशनच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा भव्य आणि आकर्षक पुतळा उभारण्यात आला. 23 जुलै 2019 या पवित्र पुतळ्याचा स्थापना दिवस होय. हा पुतळा ग्लोबवर (पृथ्वी गोल) उभा असलेला असून भारतीय जनतेला वंदन करणारा आहे. येथे दिनविशेष दिवसावर अभिवादन करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर लोक येत असतात.

संवाद मित्र, वैभव मुनेश्वर
मो. 7788931944

# अंधश्रद्धेविरुद्धचा लढा हा विज्ञाननिष्ठ समाजनिर्मितीचा पाया : रामभाऊ डोंगरे

## मुसळधार पावसातही धम्म संगोष्टीच्या ४०१ व्या सभेला उत्स्फूर्त प्रतिसाद






**नागपूर :** 'समाजातील अंधश्रद्धा, भोंदूगिरी आणि अवैज्ञानिक प्रथांविरुद्ध संघर्ष करत वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणे ही काळाची गरज आहे. भगवान बुद्धांनी दिलेला विवेक, तर्क आणि प्रज्ञेचा मार्गच खऱ्या अर्थाने विज्ञाननिष्ठ समाज घडवू शकतो,' असे प्रतिपादन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्यकारिणी सदस्य रामभाऊ डोंगरे यांनी केले. ते धम्म संगोष्टीच्या ४०१ व्या सभेत प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. धम्म संगोष्टीची ४०१ वी सभा नरेश धोपटे यांच्या निवासस्थानी (प्लॉट क्र. २०२, जयदुर्गा सोसायटी, मनीष नगर, नागपूर) उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. सकाळपासून रिपरिप पाऊस सुरू असूनही सुमारे १०० ते १२५ धम्मप्रेमींनी उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या सभेचे प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्यकारिणी सदस्य रामभाऊ डोंगरे उपस्थित होते. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या स्थापनेपासूनचा इतिहास, उद्दिष्टे तसेच समाजप्रबोधनासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. अंधश्रद्धा निर्मूलनासाठी प्रत्येक नागरिकाने वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. सभेच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, नागपूरचे कार्याध्यक्ष डॉ. सुनील भगत होते. त्यांनी 'बौद्ध धम्म आणि विज्ञानवाद' या विषयावर अभ्यासपूर्ण मार्गदर्शन करतांना बुद्धांचा तर्कनिष्ठ, विवेकवादी आणि वैज्ञानिक दृष्टिकोन समाजात रुजविण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले. यावेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्य महिला कार्यवाह देवयानी भगत यांच्यासह नागपूर शाखेच्या अध्यक्षा व दैनिक बहुजन सौरभच्या निवासी संपादक प्रा. संध्या राजूरकर, कमलाकर सतदेवे, रेखा सतदेवे, शीला डोंगरे, शशिकांत बनकर, मंगला गाणार, इंदू उमरे, वंदना मेंढे, उमेश चित्ते, संगीता ठाकरे, रेखा रंगारी, सुनीता रामटेके, पुरुषोत्तम नगराळे, संगीता नगराळे तसेच अनेक पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे व संचालन प्रताप खोब्रागडे यांनी केले. छाया अरुण केळझरे यांनी सादर केलेल्या धम्मगीताने उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमानंतर संजय मेहरे यांच्या वतीने अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली. समारोप प्रसंगी नूतनदास टेंभुर्णे यांनी उपस्थितांचे व सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले.

# उपवर्गीकरण हे राजकीय षडयंत्र : डॉ. पुरणचंद्र मेश्राम

**संवाद मित्र प्रकाश बावनगडे, नागपूर :** डॉ.आंबेडकर मिशन, मुकुंदराव आंबेडकर चौक, लष्करीबाग येथे कर्मवीर बाबू हरिदास आवळे यांची 111 वीज जयंती साजरी केली. या निमित्ताने 'कर्मवीर हरिदास आवळे यांची सम्यक दृष्टी उपवर्गीकरण व आगामी जनगणनेत बुद्धांची भुमिका' या विषयावर परिसंवाद ठेवण्यात आला होता. कार्यक्रमाचे अध्यक्ष विनायकराव जामगडे आंबेडकरी विचारवंत व अध्यक्ष कर्मवीर हरिदास आवळेबाबू प्रतिष्ठान, नागपूर प्रमुख वक्ते डॉ. पुरणचंद्र मेश्राम माजी कुलसचिव रा.तु.म.नागपूर विद्यापीठ व आंबेडकरी चिंतक आणि डॉ. शरद निंबाळकर माजी कुलगुरु, पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला हे होते. कर्मवीर हरिदास आवळे बाबू प्रतिष्ठान, नागपूर यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.



प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कर्मवीर हरिदास आवळे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पन करून अभिवादन केले. त्यानंतर मान्यवर अतिथी व अध्यक्षांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी धम्मपाल आवळे यांना कर्मवीर हरिदास आवळे बाबू जीवन गौरव पुरस्काराराने सन्मानित केले. भूपेश थुलकर यांना जगननाथ गेडाम समाजभूषण पुरस्काराने सन्मानित केले. पवन गजभिये यांना गजानन आवळे समाजभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले तसेच नरेश पाटील आणि भिमराव मेश्राम यांचा सत्कार केला.

डॉ. शरद निंबाळकर म्हणाले की, 'मी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना नेहमी युगपुरुष म्हणून संबोधतो. पशुपेक्षाही हिन जीवन जगणाऱ्या दलित समाजाला बुद्ध धम्म दिक्षा देऊन गुलामगिरीच्या दलदलीतून मुक्त केले. बाबू हरिदास आवळे हे डॉ. बाबासाहेबांचे खंदे कार्यकर्ते होते. दीक्षाभुमीची जागा आपल्या ताब्यात मिळाली ती त्यांच्याच लढ्याने. डॉ.पुरणचंद्र मेश्राम म्हणाले, आजचे सरकार जातिजातीत तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. आजच्या पिढीला आपण हिम्मत द्यायला पाहिजे. पूर्वाश्रमीचा आपला महार समाज लढवय्या होता. भिमा कोरेगावच्या युद्धात त्यांनी पेशवाई कशी संपविली हे त्यांना समजावून सांगायला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरानंतर बाबू हरिदास आवळे आणि बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांनी ईमानदारीने रिपब्लिकन पक्ष सांभाळला. आजचे सरकार उपवर्गीकरण करुन जातिजातीत तेढ निर्माण करण्याचे षडयंत्र रचित आहे. विनायकराव जामगडे आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, डॉ. बाबासाहेबांनी संपुर्ण भारत बौद्धमय करण्याचे स्वप्न पाहिले होते. त्यांना जातीविहिन समाजरचना निर्माण करायची होती. आम्ही केवळ बौद्ध म्हणूनच आपला उल्लेख करुया असे ते शेवटी म्हणाले. कार्यक्रमाचे संचालन राष्ट्रपाल मेश्राम यांनी तर आभार हरिश जानोरकर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाला पुरुषोत्तम गायकवाड, कृष्णकांत उके, सुकुशल पाटील, मधुकर बोरीकर, आंबेडकर मिशनचे वाहाणे, अजित जामगडे, इ.सह अनेक नागरिकांची उपस्थिती होती.

## महत्वाचे

### मनपात सोमवार 6 जुलै रोजी लोकशाही दिन

**नागपूर :** नागपूर महानगरपालिकेच्या वतीने सोमवार 6 जुलै 2026 रोजी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या 30 डिसेंबर 1999 च्या शासन निर्णयाप्रमाणे जनतेच्या तक्रारींचे निराकरण करण्याच्या दृष्टीने महिन्याच्या पहिला सोमवार 'लोकशाही दिन' म्हणून आयोजित करण्यात येतो. तसेच विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांनी विभागीय लोकशाही दिनात प्राप्त तक्रारीचे मनपात प्राप्त होणाऱ्या लोकशाही दिनात निकाली काढण्याचे निर्देशित केल्यानुसार डॉ. पंजाबराव देशमुख स्थायी समिती सभागृह, सिव्हिल लाईन्स येथे "लोकशाही दिन" आयोजित करण्यात येणार आहे.

### 'कहीं हम भूल न जायें' अभियानांतर्गत आठवी विद्यार्थी परिषद रविवारी

**नागपूर :** 'कहीं हम भूल न जायें' या अभियानाच्या विद्यमाने रविवार, दि. ५ जुलै २०२६ रोजी आठव्या विद्यार्थी परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉन्फरन्स हॉल, उरूवेला कॉलोनी, वर्धा रोड, नागपूर येथे आयोजित करण्यात आली असून परिषदेस सकाळी ९.३० वाजता प्रारंभ होईल. परिषदेचे अध्यक्ष ॲड. रितेश पाटील (AoR, सुप्रीम कोर्ट ऑफ इंडिया) राहतील आणि प्रमुख मार्गदर्शक ॲड. अश्विनी मून राहणार आहेत. या परिषदेमध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व वैचारिक जडणघडणीसाठी विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. त्यामुळे नागपूरसह विविध जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांसह व सहपरिवार या परिषदेस मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### 15 जुलै पासून जपानी भाषा प्रशिक्षण वर्ग

**नागपूर :** बुद्ध विहार समन्वय समितीच्या विद्यमाने दि. 15 जुलै पासून नियमित सुरु होणाऱ्या प्रशिक्षण वर्गाची प्रवेश घेण्याची अंतिम तारीख शुक्रवार दि. 10 जुलै 26 आहे. हा कोर्स 5 महिन्याचा असून परीक्षा डिसेंबरमध्ये पहिल्या आठवड्यात पुणे येथे होणार आहे. सोमवार ते शुक्रवार दररोज सकाळी व संध्याकाळी 7 ते -8 या वेळेत समता बुद्ध विहार काशिनगर, शताब्दी चौक, नागपूर येथे नियमित ऑनलाईन व ऑफ लाईन वर्ग होतील. या प्रशिक्षण वर्गात प्रा. प्रमोद भगत (M tech Japani pariksha N 5 N 4 N3 pass) नियमित शिकविणार आहेत. जपानी परीक्षा N5 व N4 उत्तीर्ण झाल्यावर जपान मध्ये जॉब करण्याची संधी मिळू शकते. प्रवेश घेण्यासाठी वर्ग 7 च्या पुढे शिकणारे विद्यार्थी अपेक्षित आहेत. परीक्षा पास झाल्यावर JLPT ( Japani language proficiency test ) कडून प्रमाणपत्र मिळेल निकाल जानेवारी 2027 मध्ये लागेल. अधिक माहितीसाठी संपर्क इंजि. ए. के. पाटील 7972987584,
प्रा. आनंद वासनिक 9822238757,
धेनूत्तम बोंबर्डे 9561561788.

### अजयकुमार खोब्रागडे यांची सचिव पदी नियुक्ती



**नागपूर:** प्रबोधनकार अजयकुमार खोब्रागडे यांची नागपूर शहर सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली. अजयकुमार यांनी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले असून, त्यांच्या कार्यक्षम नेतृत्वामुळे बहुजन समाज पार्टीची संघटनात्मक ताकद अधिक वाढेल, तसेच पक्षाचे विचार तळागाळातील जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. नवीन जबाबदारी स्वीकारल्याबद्दल प्रबोधनकार अजय कुमार यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

### वसंतराव नाईक यांना महावितरण व महानिर्मितीतर्फे अभिवादन



**नागपूर :** महाराष्ट्राच्या आधुनिक कृषी व औद्योगिक विकासाचा पाया रचणारे, हरित क्रांतीचे प्रणेते आणि बहुजन समाजाच्या उत्कर्षासाठी आयुष्य वेचणारे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना महावितरण आणि महानिर्मितीच्या वतीने आज कृतज्ञतापूर्वक अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली.

# महावितरणमधील 'कंत्राटी गुलामी'वर डॉ. नितीन राऊत आक्रमक

## महावितरणमध्ये सहाय्यक कर्मचाऱ्यांचे शोषण; सभागृहात सरकारला लगावला खडा सवाल



**मुंबई :** महावितरणसारख्या महत्त्वाच्या सार्वजनिक उपक्रमात काम करणाऱ्या हजारो सहाय्यक कर्मचाऱ्यांचे प्रशासनाकडून पद्धतशीर शोषण केले जात आहे. 'कामगार जीव धोक्यात घालून राबतात, मात्र प्रशासन त्यांना कंत्राटी गुलामीत अडकवून ठेवत आहे,' असा घणाघाती आरोप करत राज्याचे माजी ऊर्जामंत्री आणि ज्येष्ठ आमदार डॉ. नितीन राऊत यांनी विधिमंडळात महावितरणच्या शोषक धोरणांचा बुरखा फाडला. विरारमधील एका २२ वर्षीय विद्युत सहाय्यकाच्या दुर्दैवी मृत्यूनंतरही प्रशासनाला जाग येत नसल्याने डॉ. राऊत यांनी सरकारला धारेवर धरले.

अनुभवी हातांना 'कंत्राटी'च्या जोखडात अडकवण्याचा अट्टहास का?

महावितरणमध्ये 'उपकेंद्र सहाय्यक' पदाच्या भरतीसाठी जाहिरातीद्वारे आधीच दोन वर्षांचा अनुभव मागितला जातो. स्पर्धेत परीक्षेत व तांत्रिक परीक्षेत निवड झाल्यानंतर या अनुभव असलेल्या उमेदवारांना नियुक्ती दिल्यावर पुन्हा तीन वर्षांच्या कंत्राटी कालावधीवर आणि अत्यंत तुटपुंज्या मानधनावर ठेवले जाते. त्यांच्याकडून नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणेच जोखमीची कामे करून घेतली जातात. हा प्रकार केवळ कर्मचाऱ्यांच्या कौशल्याचा आणि त्यांच्या अनुभवाचा क्रूर अपमान आहे. डॉ. नितीन राऊत यांनी सभागृहात या धोरणाचा निषेध करत, अशा अनुभवी कर्मचाऱ्यांना कोणताही विलंब न करता तात्काळ नियमित सेवेत सामावून घेण्याची ठाम मागणी केली आहे.

डॉ. राऊत यांनी सभागृहात उपस्थित केलेल्या मुद्द्यांनुसार, उपकेंद्र सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक (लेखा), विद्युत सहाय्यक आणि कार्यालयीन सहाय्यक हे कर्मचारी अहोरात्र, पावसाळ्यात आणि नैसर्गिक आपत्तीच्या काळात सेवा बजावत आहेत. भरती प्रक्रियेत स्पर्धा परीक्षेद्वारे या सहाय्यक कर्मचाऱ्यांची निवड झाली असता पुन्हा तीन वर्षे कंत्राटी स्वरूपात ठेवल्याने अल्प मानधनामुळे कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आली आहे. तसेच हा तीन वर्षांचा कंत्राटी कालावधी मूळ सेवेत ग्राह्य धरला जात नसल्याने, कर्मचाऱ्यांचे ज्येष्ठता, वेतनवाढ आणि पदोन्नतीचे मोठे नुकसान होत आहे, याकडे डॉ. राऊत यांनी लक्ष वेधले. यावर डॉ. राऊत यांनी दोन वर्षे अनुभवी उपकेंद्र सहाय्यक कर्मचाऱ्यांना कंत्राटीच्या जाळ्यातून मुक्त करून, त्यांना त्वरित थेट नियमित सेवेत सामावून घेण्याची मागणी केली आहे. तसेच कनिष्ठ सहाय्यक (लेखा), विद्युत सहाय्यक आणि कार्यालयीन सहाय्यक संवर्गाची अन्यायकारक ३ वर्षांची कंत्राटी अट तात्काळ रद्द करून ती १ वर्षावर आणून सर्व सहाय्यक कंत्राटी कर्मचाऱ्यांचा कंत्राटी कालावधी मूळ सेवेत ग्राह्य धरून त्वरित वेतनवाढ, ज्येष्ठता आणि पदोन्नतीचे लाभ देण्याची मागणी केली आहे. सहाय्यक कर्मचारी राबतात, मात्र प्रशासन त्यांना कंत्राटी गुलामीत अडकवून ठेवत आहे, असे म्हणत डॉ. राऊत यांनी सरकारी धोरणांचा पर्दाफाश केला. या गंभीर विषयावर सरकारने तात्काळ सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी आग्रही मागणी त्यांनी केली. महावितरणच्या या शोषणकारी धोरणांविरुद्ध कर्मचाऱ्यांमध्ये संतापाची लाट असून, शासन आता या मागण्यांवर काय ठोस निर्णय घेते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# काम झाल्यावर उरलेला कचरा तुमच्यासाठी सोडला जातो...



**नागपूर :** जेव्हा कंत्राटदार शहरातील रहिवाशांच्या समस्या सोडवण्यासाठी काम हाती घेतात. त्यामुळे नेमलेले कंत्राटदार उरलेले साहित्य आणि कचरा कामाच्या जागेच्या आजूबाजूला किंवा काही अंतरावर सोडून निघून जातात. त्यात खडी, विटांचे तुकडे, थोडी खडी आणि वाळूदेखील असते. पावसाळ्यात, या विटा आणि खडी गटारात अडकतात किंवा वाहून रस्त्यावरही येतात. यामुळे येणाऱ्या-जाणाऱ्यांच्या समस्या वाढतात. कधीकधी दुचाकीस्वारांना त्यांची धडक बसते आणि ते अपघाताचे बळी ठरतात. जेव्हा स्थानिक नागरिक या समस्येकडे लक्ष वेधतात, तेव्हा कामगार त्यांच्याकडे दुर्लक्ष करून निघून जातात. केबिल बिछाने वालों का भी यही मामला होता है। (प्रशासनाने अशा निष्काळजीपणाची दखल घेतली पाहिजे.) जमात-ए-इस्लामी हिंद नागपूरचे माध्यम प्रभारी, एका ज्येष्ठ नागरिकाने सुचवले आहे की, प्रशासनाने अशा निष्काळजीपणाची दखल घेतली पाहिजे. नियुक्त कंत्राटदारांना असा निष्काळजीपणा न करण्याच्या सूचना द्याव्यात.

# ऑपरेशन थंडर अंतर्गत अंमली पदार्थविरोधी जनजागृती




**नागपूर :** नागपूर शहर पोलीस आयुक्तालयाच्या 'ऑपरेशन थंडर' अभियानांतर्गत अंबाझरी पोलीस ठाण्याच्या सहकार्याने धरमपेठ झोन क्र. २ येथील मनपा समुपदेशन केंद्रात अंमली पदार्थविरोधी जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला धरमपेठ झोन क्र. २ च्या सभापती धनश्री देशपांडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक मिना बारंगे, समाज विकास विभागाच्या समूह संघटक अनिता वर्धट व समुपदेशन केंद्राच्या संचालिका नंदा कोल्हटकर उपस्थित होत्या. परिसरातील महिला व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. यावेळी API मिना बारंगे यांनी अंमली पदार्थांचे वाढते व्यसन, त्याचे आरोग्य व समाजावर होणारे दुष्परिणाम याविषयी मार्गदर्शन करून संशयास्पद माहिती तात्काळ पोलिसांना देण्याचे आवाहन केले. नंदा कोल्हटकर यांनी महिला हक्क, कौटुंबिक कायदे व बालसंरक्षण विषयक माहिती दिली, तर धनश्री देशपांडे यांनी व्यसनमुक्ती व महिला सक्षमीकरणाचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अनिता वर्धट यांनी केले. या उपक्रमामुळे अंमली पदार्थांविरोधात जनजागृती निर्माण होऊन व्यसनमुक्त समाज घडविण्यास हातभार लागेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# नागपूर पुन्हा एकदा 'क्राइम कॅपिटल'च्या वाटेवर?




**नागपूर :** विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त म्हणून दाखल झाल्यानंतर त्यांनी गुंडांना कायदा हाती घ्याल तर सोडणार नाही, असा दम दिला होता. मात्र त्यांच्या इशाऱ्यानंतरही उपराजधानीत हत्याकांडाचे सत्र थांबेनासे झाले आहे. भांडेवाडीत कुख्यात गुन्हेगाराची तर कामठीत महिलेची गुरुवारी एकाच दिवशी हत्या आल्याने शहर हादरले आहे. पोलीस आयुक्तांनी पदभार स्वीकारल्यावंतर सलग चार खून झाल्याने पोलीस दलात खळबळ उडाली आहे. गणेश प्रेमलाल बोरकर (४०) असे भांडेवाडीत आणि भाग्यश्री अशी कामठीत खून झालेल्यांची नावे आहेत. भांडेवाडी परिसरात मारला गेलेला गणेश हा कुख्यात असून, याच्याविरुद्ध खुनासह अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. काही दिवसांपूर्वीच त्याच्याविरुद्ध एमपीडीएअंतर्गत स्थानबद्धतेची कारवाई झाली होती. गुरुवारी रात्री ८ च्या सुमारास गणेश हनुमाननगर भागात होता. याचवेळी तीन ते चार युवकांनी गणेशवर वार केले. गणेश रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. मारेकरी पसार झाले. दरम्यान एका नागरिकाने भांडेवाडी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी गणेशला रुग्णालयात नेले. डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. जुन्या वैमनस्यातून त्याची हत्या झाल्याचा संशय पोलिसांना आहे. पोलिस परिसरातील मारेकऱ्यांचा शोध घेत आहेत.तर नवीन कामठी पोलिस ठाण्याच्या हद्दीत गादा गावाजवळील फार्म हाऊस परिसरात गुरुवारी रात्री भाग्यश्री नावाच्या महिलेचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात आढळला.

# प्रबुद्ध रंगभूमीच्या कलाकारांकडून संजय सायरे यांचा वाढदिवस साजरा



**नागपूर :** 'कोणी कितीही बदलु दे मी माझ्यातला संजय बदलणार नाही' असे परखड उद्गार प्रबुद्ध नाट्य परिषद, महाराष्ट्रचे अध्यक्ष संजय सायरे त्यांच्या वाढदिवसा निमित्त काढले. तीस-पस्तीस वर्षांपासून नाट्य कलेच्या माध्यमातून प्रबुद्ध रंगभूमी नागपूर तर्फे समाज प्रबोधन करीत असलेले प्रबुद्ध नाटकार, प्रबुद्ध विद्यालयचे मुख्याध्यापक संजय सायरे यांचा प्रबुद्ध रंगभूमी नागपूरच्या कलावंतांच्या वतीने त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. या प्रसंगी ख्यातनाम कवी लोकनाथ यशवंत कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. तर प्रबुद्ध नाटककार महाकवी भदंत अश्वघोषचे लेखक भानुदास जिवने, जेष्ठ रंगकर्मी सारनाथ रामटेके, मुल्य संगर साहित्य विचार मंचचे आत्माराम ढोक प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होते. या प्रसंगी महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण नाट्य स्पर्धेतील सहभागी कलावंतांना सन्मान पत्र वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन कवी नाट्य कलावंत रंगराज गोस्वामी यांनी तर आभार कवी संजय गोडघाटे यांनी केले. यावेळी विनोद लोणारे, रत्नपाल गोटेकर, सुनील शेंडे, ज्योत्स्ना बनसोड, प्रिती तीरपूडे, राजेश बनसोड, प्रमोद श्रीरामे, रोशन खोब्रागडे, नागेश वाहुरवाघ, शामलीला वनकर, सुधाकर मेश्राम इत्यादी उपस्थित होते.

# आंतरजिल्हा बदलीच्या अटीमुळे 'नोकरी की कुटुंब?' शिक्षकांसमोर यक्षप्रश्न!




**यवतमाळ :** ग्रामीण विद्यार्थ्यांचे भविष्य घडवणाऱ्या शिक्षकांचे स्वतःचेच भविष्य आणि कौटुंबिक आयुष्य शासनाच्या एका तुघलकी अटीमुळे अंधकारमय झाले आहे. सन २०२३-२४ मधील पवित्र पोर्टल शिक्षक भरतीतून जिल्हा परिषद व खाजगी शाळांमध्ये रुजू झालेल्या नवनियुक्त शिक्षकांच्या वाट्याला 'शिक्षण सेवक म्हणून रुजू झाल्यानंतर आंतर जिल्हा बदली होणार नाही', या अटीमुळे नोकरीचा आनंद कमी आणि कुटुंबापासून विरहाचे दुःखच अधिक आले आहे. या संपूर्ण शोकांतिकेच्या मुळाशी आहे शिंदे सरकारच्या काळातील शालेय शिक्षण विभागाचा एक शासन निर्णय आहे. ज्यामध्ये शिक्षकांना हयातभर एकाच जिल्ह्यात राहण्याची अट घातली आहे! शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने २१ जून २०२३ रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार, पवित्र प्रणालीद्वारे नव्याने नियुक्त होणाऱ्या शिक्षकांवर अत्यंत जाचक अटी लादण्यात आल्या आहेत. या जीआरमधील मुद्दा क्रमांक ४ नुसार, नव्याने नियुक्ती झाल्यानंतर संबंधित शिक्षकास जिल्हा बदलीचा कोणताही हक्क राहणार नाही. जर एखाद्या शिक्षकाला दुसऱ्या जिल्ह्यात जायचे असेल, तर त्याला रितसर राजीनामा देऊन पुन्हा नव्याने परीक्षा द्यावी लागेल आणि पवित्र पोर्टलद्वारेच पुन्हा नियुक्ती मिळवावी लागेल, अशी अट मुद्दा क्रमांक ५ मध्ये घालण्यात आली आहे. 'निवृत्त होईपर्यंत त्याच जिल्ह्यात काम करावे लागेल', या अजब आणि जाचक अटीमुळे शेकडो गुणवंत शिक्षकांवर कुटुंबापासून दूर राहण्याची वेळ आली आहे. या सर्व नवनियुक्त शिक्षकांचा ३ वर्षांचा शिक्षण सेवक काळ २०२७ मध्ये संपत आहे. या आदेशातील मुद्दा क्रमांक ९ आणि १० नुसार, शिक्षण सेवक कालावधी पूर्ण झाल्यानंतर या शिक्षकांच्या सेवेचे मूल्यमापन करण्यासाठी एक संयुक्त समिती गठीत केली जाणार असून त्यांची 'मूल्यमापन चाचणी' घेतली जाणार आहे. जर या चाचणीत किंवा वर्तणुकीत दोष आढळला, तर ६ महिने प्रशिक्षण आणि ५० टक्के वेतन कपातीसारखी कठोर कारवाई करण्याची तरतूद यात आहे. परंतु, शिक्षण सेवक काळ संपून शिक्षक पूर्ण वेतनावर येणार असले, तरी त्यांचा कौटुंबिक वनवास संपणार नाही. 'बदली बंदी' कायम राहणार असल्याने शिक्षकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. शासनाच्या या अमानवी नियमामुळे आई-वडील, पती-पत्नी आणि मुले एकमेकांपासून दुरावली आहेत. कोल्हापूरचा शिक्षक गोंदियात तर, गडचिरोलीचा शिक्षक पालघर जिल्ह्यात कार्यरत असल्याने अंतरामुळे अनेक हसत्या-खेळत्या सुखी संसारांची पार वाताहत झाली आहे.

# समता बुद्ध विहारात भारतीय बौद्ध महासभा महानगर बैठक



**नागपूर :** भारतीय बौद्ध महासभेची महानगर नागपूरच्या वतीने समता बुद्ध विहार, शताब्दी चौक, द्वारकापुरी येथे आयोजित करण्यात आली. भंते कुशल धम्मसुंदरो यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेला प्रामुख्याने केंद्रीय शिक्षक देवानंद वानखेडे, गणपत पेठकर, बी. के. हिवराळे हे प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी वर्षवास निमित्ताने 'प्रवचन मालिका' नागपूर शहराच्या विहारांमध्ये सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रामुख्याने श्रामनेर व बोधाचार्य शिबिर, वर-वधु सुचक व समता सैनिक दलाची बांधणी या विषयावर सखोल चर्चा करण्यात आली. यावेळी समता सैनिक दलाचे दोन दिवसीय शिबिर जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात घेण्याचे ठरले. यावर लवकरच अंमलबजावणी करण्यात येईल, असा आशावाद सुद्धा सर्व पदाधिकारी यांनी व्यक्त केला. भारतीय बौद्ध महासभा यांच्यामार्फत वर वधु सुचक मंडळाचे उद्घाटन होणार अशी घोषणा केली. तसेच जुलै महिन्यात दहा दिवसीय श्रामनेर शिबिर घेण्यात येईल अशी सुचना केली. यावेळी केंद्रीय संघटक पद्माकर गणवीर यांची विशेष उपस्थिती लाभली. या बैठकीला रवींद्र एस. डोंगरे, विनय ढोके, विजय पाटील, हरिदास नारनवरे, संघशील मेश्राम, अरुण भारशंख, धनराज राजवंश, अंकुश गणवीर, मनोज वाळके, बौधेंद्र डोंगरे, नामदेव निकोसे, नंदलाल मेश्राम, अरुण शेंडे, देवेंद्र लांजेवार, अमरदीप पझारे, नरेंद्र थुल इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीचे प्रवीण कांबळे यांनी संचालन केले तर, बैठक घेण्यामागची भूमिका शहराध्यक्ष विजय मेश्राम यांनी मांडली. तर आभार गंगाधर कांबळे यांनी केले.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एआय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648